# गोष्टी पुरून उरणाऱ्या

## भाग : १

**पुरुषोत्तम धाक्रस**



IRBK-0130605

रोहन प्रकाशन

संस्था मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे
सरस्वती मंदिर, सुभाष पथ,
स्टेशन रोड, जिल्हा परिषदे समोर,
ठाणे-४०० ६०१
दुरध्वनी - २५४०६७८७

# अनुक्रमणिका

काव्ळ्याची मोटार / ५
इमानबहाद्दर / १२
लवंगी मिरची / १९
अंजूची मंजू / २७
दोस्तीच्या मस्त वाटेनं! / ३४

***

IRBK-0130605

# या गोष्टींची गोष्ट !

तर या आहेत गोष्टी पुरून उरणाऱ्या ! म्हणजे कळलं ना? यातली कुठलीही गोष्ट वाचून झाली तरी मनात रेंगाळतेच. तिच्यातलं काही ना काही, कुणी ना कुणी आठवत राहतं.

आता हेच पाहा ना– या गोष्टीतला 'टिंबक्टू' केवढा छोटा आहे? पण कितीही कुत्रे अंगावर आले तरी मागं हटतो का? त्या सर्वांशी फाइट देतो आणि त्यांना पुरून उरतो. आणि आपणाला दाखवून देतो की प्रसंग कसाही असला तरी शक्ती, युक्ती, धाडस या सर्वांचा उपयोग करून बिकट प्रसंगातून तरून जायचं. रडत बसायचं नाही.

कावळ्याची मोटार, अंजूची मंजू, झुंबररावांचा कर्दनकाळ इत्यादी सर्व गोष्टी मनोरंजनाबरोबर तुम्हांला असंच काही ना काही देतील, नवा अनुभव देतील. अशा अनुभवांचा साठा तुमच्या डोक्यातला 'कॉम्प्युटर' आपल्या पोटात भरून ठेवील, तुम्हांला मोठं होताना हवा तेव्हा यातला एकेक अनुभव काढून देईल. लक्षात ठेवा, ज्याच्या गाठी अनुभवांचा साठा, तोच माणूस बनतो मोठा!

'गोष्टी पुरून उरणाऱ्या' या पुस्तकातल्या गोष्टी दोन भागांत दिल्या आहेत. हा गोष्टींचा खजिना आहे आयुष्यभर पुरणारा, कठीण प्रसंगात सोबत करणारा, मुलांना मोठी माणसं करणारा ! तर अशा या गोष्टी वाचून पाहा, आणि खालील पत्त्यावर कळवा– पुरून उरणाऱ्या आहेत की नाहीत ते. बरं का?

१०२ अ सरोजिनी सोसायटी,
लोकमान्य कॉलनी, पौड रोड,
पुणे ४११०३८.

– लेखक
**पुरुषोत्तम धाक्रस**

# कावळ्याची मोटार

म्हशीच्या पाठीवर बसून कावळा फिरायला निघाला होता. मोटारीत बसल्यासारखा! रोजच सकाळी तो तिच्या पाठीवर बसून फिरायला जायचा आणि जाता जाता म्हशीच्या पाठीवरचे गोचिडबिचिड असले प्राणी खाऊन नाहीसे करायचा. म्हशीची पाठ साफ होई आणि कावळ्याला पण मोटारीतून भटकायला मिळे. पंख पसरून उडायला नको आणि ढुंगण वाकडं करीत चालायला नको. म्हशीच्या अंगावरचे गोचिड म्हणजे तर उसळच ती! चोचीनं एकेक उचलायचा आणि तोंडात टाकायचा. काय मज्जा यायची!

म्हैस पण रोज सकाळी कावळ्याची वाट बघत असायची. हा येतोय कधी आणि आपण फिरायला जातोय कधी! हा येतोय कधी आणि आपल्या अंगावरचे गोचिड उठवतोय कधी! रक्त शोषून तिला हैराण करायचे ना ते? कावळा मग रुबाबात यायचा आणि म्हशीच्या मोटारीत बसून जायचा– मालक असल्यासारखा!

पण एक दिवस काय झालं? म्हैस कावळ्यावर जाम बिथरली. तिनं त्याला शेपटीचा तडाखा चढवून उडवूनच लावलं. कावळ्याला वाटलं, चुकून हिनं शेपटी फिरवली असेल. माशीबिशी पाठीवर बसली असं वाटून. म्हणून हवेत एक राउंड मारून पुन्हा तो म्हशीच्या पाठीवर येऊन बसला. पण छे! म्हशीनं पुन्हा त्याला उडवून लावलं. त्यानं अशा दहा राउंडा मारल्या तरी म्हैस काही त्याला पाठीवर बसू देईना. शेपटीनंच नव्हे, तर शिंगांनीही तिनं त्याला ढुसकून लावलं. म्हणाली, “नाही म्हणजे नाही म्हणजे नाहीच!”

30605
9/12/2002



शेवटी कावळ्यानं तिची पाठ सोडून एक छोटंसं झाड गाठलं. तिथं बसून म्हणाला, "का ग? आज एवढी रुसलीयस कुणावर? आणि त्याचा राग माझ्यावर कशाला काढतेयस?"

"दुसऱ्या कुणावर नाही– तुझ्यावरच राग आहे माझा!"

"कां ग बाई? माझ्या हातून अशी काय चूक झाली?"

"तुझ्या हातून नाही–" म्हैस म्हणाली, "माझीच चूक झाली ती!"

"ती म्हणजे काय ती?" कावळ्यानं आश्चर्यानं विचारलं. "कसली चूक?"

"तुला पाठीवर बसायला दिलं ही! तू एवढा दुष्ट आणि कृतघ्न असून सुद्धा!" म्हैस म्हणाली.

"अग, पण मी असं काय केलं ते तर सांग ना?" कावळ्यानं विचारलं.

तशी म्हशीनं आपल्या उजव्या शिंगाखालची जखम त्याला दाखवली आणि विचारलं, "गोचिड उपटून काढताना मानेला हळूच जखम करून ठेवायची. ती टोचून टोचून वाढवायची आणि चिघळवायची. हे तुझे धंदे. अशाच जखमा करून तू मागं एका गायीला मारलंस की नाही? आणि तरी ते विसरून मी तुला पाठीवर बसायला दिलं ही चूक झाली माझी. दुष्ट, नीच, हलकट!" काय हवं ते बोलत सुटली.

पण कावळ्याला त्याचं काही नाही. उलट म्हणतो कसा? "फुकट नाही फिरवत तू मला पाठीवरून. तुझ्या अंगावरचे गोचिड मी नाहीसे करतो ते?"

"नाहीसे कुठे? पोटात घालतोस आपल्या!" म्हैस म्हणाली,

"माणसाघरच्या चण्याची मस्त उसळ खाल्ल्यासारखं वाटतं म्हणून! घाणेरडा कुठला. जळलं तुझं तोंड– शेंबडापासून श्रीखंडापर्यंत काही चालतं मेल्याला! त्याबद्दलही माझं म्हणणं काही नाही. पण दुसऱ्याचं खाऊन त्याच्यावरच उलटायचं?– त्यालाच जखम करून ठेवायची?"

कावळा तोंड चुकवून म्हणाला, "चुकून लागली असेल चोच. गोचिड खाता खाता!"

"एवढी मोठी जखम केलीस ही चुकून काय?" म्हशीनं विचारलं. "बाकीचे किती पक्षी येऊन बसतात. तेही गोचिड खातात. त्यांची कुठे चोच लागत नाही ती– चुकून?"

तेवढ्यात बाजूच्या झाडावर एक बगळा येऊन बसला. पांढरा शुभ्र, हसऱ्या चेहऱ्याचा, गुलाबी चोचीचा. झाडावर बसला तोही कसा? झाडाला फूल लागल्यासारखा. त्याला पाहून म्हैस खूष झाली. म्हणाली, "अरे, झाडावर कशाला? पाठीवर बस ना माझ्या."

तशी कावळा खांदीवर चोच घासून म्हणाला, "असं आहे काय? बरोबर आहे– तो गोरागोमटा ना? आम्ही काळे कुळकुळीत!"

म्हैस म्हणाली, "तो गोरागोमटा म्हणून नव्हे. तू चोर भामटा म्हणून! आणि तू काय, मी सुद्धा काळी आहे. पण बगळा नुसता गोरा नाही. त्याचे गुण सुद्धा गोरे आहेत. अंगावरचे गोचिड केव्हा काढतो कळत पण नाही. आणि तू? जिथे तिथे टोचा मारून ठेवणार. शिवाय पाठीवर शिटून ठेवणार ते निराळंच. खायचं तिथे हगायचं! शीः!"

"आणि तू जिथे तिथे घालून ठेवतेस ते शेणाचे ढीग?" कावळ्यानं विचारलं.

म्हैस म्हणाली, "त्याचं खत होतं जमिनीला. माझं शेण हे जगातलं सर्वोत्तम खत आहे समजलास? त्यामुळं झाडं वाढतात. त्यांना फळं येतात, ती तुला खायला मिळतात आणि त्या झाडांवर तुला राहायला मिळतं. तू पाठीवर घाण करतोस त्याचा काय उपयोग आहे? त्याचा सोड, तुझाच मुळी काय उपयोग आहे? कापलेल्या अंगठ्यावर मुतणार सुद्धा नाहीस. नुसता खायला काळ आणि भुईला भार मेला! चल,

चालता हो बघू इथून!''

पण म्हैस एवढं बोलली तरी कावळा हलला नाही. कोडग्यासारखा तिथेच बसून राहिला. बगळ्यावर दातओठ खात.

म्हशीनं मग त्याचा नाद सोडून दिला. बगळ्याला खाली बोलावलं. आणि ती तिथून चालायला लागली. कावळ्याला 'गेलास उडत' म्हणून. पण कावळा उडत गेला नाही. तिथेच बसून राहिला– मख्खपणे.

बगळा म्हशीकडे यायला निघाला मात्र, त्याबरोबर कावळ्यानं उंच सूर मारून त्याला हवेतच गाठलं आणि त्याच्या मानेवर चोचीचा वार केला. बगळा त्या वारानं एवढा घायाळ झाला की त्यानं ती वाटच सोडली, आणि तो तिथून निघून गेला.

बगळ्याला असं उडवून लावल्यावर कावळा परत म्हशीजवळ आला. ऐटीत विचारू लागला, ''तुझा बगळा गेला उडत. आता काय करशील? शेवटी तुला माझ्याचकडे यावं लागेल गोचिड घालवण्यासाठी.''

म्हशीला त्याचा असा राग आला? तिला वाटलं, या कावळ्याला शिंगांत पकडून पायांखाली घ्यावं आणि चिरडून टाकावं. पण कावळा तिच्या तडाख्यात सापडणार कसा? तो जवळ येतच नव्हता. इकडे गोचिडांनी तर म्हशीला नको जीव करून सोडलं होतं. रक्त चोखून चोखून बेजार केलं होतं. झुडपात तोंड खुपसून नि झाडाला अंग घासून गोचिडांना नष्ट करण्याचा तिनं खूप प्रयत्न केला. पण गोचिड त्यात सापडतच नव्हते.

तेवढ्यात तिला साळुंकीची जोडी दिसली. तिनं आपली मान त्यांच्यापुढं धरली. म्हणाली, ''जमिनीतले किडे उकरीत कशाला बसलाहात? त्यापेक्षा माझ्या अंगावर येऊन बसा ना! कसले एकेक गोचिड आहेत बघा तरी. एकदा खाल्लेत तर दुसरं काही नको म्हणाल!''

साळुंका साळुंकीला म्हणाला, ''चल, बघूया तरी एवढं म्हणतेय तर!'' आणि दोघंही जाऊन म्हशीच्या पाठीवर बसली. त्याबरोबर कावळा झुपकन आला तिथे. क्राव क्राव करीत ओरडला, ''खबरदार म्हशीच्या पाठीला चोच लावाल तर. ते माझं खाणं आहे– हला!''

“पण म्हशीनंच बोलावलंय आम्हांला–” साळुंक्यानं समजुतीनं सांग प्रयत्न केला.

साळुंकीनं विचारलं, “पाठ म्हशीची. तिच्या पाठीवरचं खाणं कसं?”

“जास्त बोलायचं काम नाही.” कावळा खेकसला. “आता बऱ्या बोलानं उठताय तिथून की मी येऊन उठवू?”

साळुंका पुटपुटला, “हा जुलूमच झाला.”

साळुंकी कुरकुरली, “ही गुंडगिरी झाली.”

पण असं म्हणाली तरी कावळ्यापुढं त्यांचं काय चालणार? दोघंही निमूटपणं उडून बाजूला झाली. तशी म्हैस कावळ्याला म्हणाली, “खाली ये. तुझा कोथळाच काढते बघ मेल्या!”

कावळा दुष्टपणं हसून म्हणाला, “माझा कोथळा काढल्यावर तुझ्या अंगावरचे ते चिकट गोचिड उपटून काढणार कोण? हाः हाः हाः!”

तिकडे गोचिडांनी म्हशीचं रक्त शोषून तिला अगदी हैराण करून सोडलं होतं. म्हणूनच कावळ्याचा नाद सोडून ती पुढं गेली. टेकडीच्या पायथ्याशी आली. तिथे टिटव्यांचा एक मोठा थवा दिसत होता. त्या उगाचच इकडून तिकडे आणि तिकडून इकडे उनाडत होत्या. खिदळत होत्या, ओरडत होत्या. म्हैस त्यांच्या पुढ्यात येऊन उभी राहिली. म्हणाली, “कसलं खाणं आणलंय बघा तरी. गोचिड आहेत गोचिड! सगळ्या मिळून बसलात अंगावर तर पाच मिनिटांत फन्ना उडवाल. चला, चला– आटपा लवकर.”

पण टिटव्यांची काय हिंमत होती पुढं येण्याची? कावळा तिथेही येऊन टपकला. आंब्याच्या खांदीवरून खाली न उतरता म्हणाला, “ए टवळ्यांनो, ते खाणं माझं आहे. पुढं यायचं काम नाही. पंख तोडून ठेवीन एकेकाचे!”

ही धमकी ऐकल्यावर टिटव्या काय पुढं येतात? कावळा नुसती धमकी देऊन थांबला नाही. बाण मारल्यासारखा सर्वांच्या अंगावर झेप घेऊन गेला. त्यामुळे सगळीच पाखरं घाबरून गेली. टिटव्याच काय,


आणखीही खूप प्रकारचे पक्षी तिथे होते. कवडे, भोरपी, दयाळ– हव्वे तेवढे पक्षी होते. पण कावळ्यापुढं येण्याची हिंमत कुणीही करीत नव्हता.

आता म्हैस हवालदिल झाली होती. गोचिड रक्त पिऊन हैराण करीत होते आणि कावळा तर आपल्याशिवाय कुणालाही त्यांना तोंड लावू देत नव्हता.

हसाणीच्या झाडावर बसून खंड्या पक्षी हे सर्व पाहत होता. खंड्या म्हणजे मासेपारधी. नदीत डुबकन उडी मारायची आणि मासे पकडून गट्टम करायचे हा त्याचा उद्योग. तो हळूच म्हशीच्या जवळ आला. कावळ्याला आपण दिसणार नाही अशा रुंद पानाआड बसला. म्हशीला हळूच म्हणाला, "बघतेस काय? खाली नदी आहे ना? त्यात जाऊन बस. एक गोचिड शिल्लक ठेवणार नाहीत."

"कोण?" म्हशीनं विचारलं.

"मासे." खंड्या म्हणाला. "तू नुसती आडवी पडून राहा नदीच्या पाण्यात आणि काय चमत्कार होतो बघ. गोचिडच काय, तुझ्या अंगावर धुळीचा एक कण शिल्लक ठेवणार नाहीत. फक्त अंग झोकून दे पाण्यात, आणि गंमत बघत बस. माशांचे थवेच्या थवे येतील धावत आणि तुझं सगळं अंग चकाचक करून देतील. तुला तर कसलीच तोशिस नाही. फक्त थोड्या गुदगुल्या होतील. फुदकन हसू येईल. पण



तेही चांगलंच ना? तू तिकडे हसतेयस हे कावळ्याला दिसलं की त्याच्या नाकाला मिरच्या झोंबतील ना? आपलं खाणं माशांनी उठवलं म्हणून! कावळ्याची मिजास खाली येईल. कळलं का?''

कावळ्याची मिजास खाली येईल म्हटल्यावर म्हैस एवढी खूष झाली! कळलं म्हणायलाही तिथे थांबली नाही. तिनं सरळ नदीचा रस्ता पकडला. तिनं नदीच्या पाण्यात पाय ठेवला मात्र, सगळ्या नदीतले मासे धावत सुटले. रुपेरी मासे, सोनेरी मासे, पांढरे मासे, काळे मासे, छोटे मासे, मोठे मासे– पाहावं तिकडे मासेच मासे. जणु काही ते माशांचं गॅरेज होतं आणि त्यांच्या गॅरेजमध्ये दुरुस्तीसाठी मोटारच आली होती! तासाभरातच माशांनी ती धुऊन लखलखीत केली. तशी म्हैस खूष होऊन बाहेर आली. काम झाल्यावर मोटार गॅरेजमधून बाहेर पडते तशी.

बाहेर येता येता तिनं पाण्यात आपलं रूप न्याहाळलं. तेव्हा तिला इतका आनंद झाला. हे आपलंच रूप का? तिला ते खरंच वाटत नव्हतं. गोचिडच काय, पण शेण, घाण, किडे– सगळं माशांच्या पोटात गडप. आणि मासे नदीच्या पोटात गडप!

मग तिला कावळ्याची आठवण झाली. हा गेला कुठे? तिला आपलं लखलखीत अंग त्याला दाखवायचं होतं आणि म्हणायचं होतं– गेलास उडत!

पण कावळा म्हैस सांगेपर्यंत थांबला नव्हता. तो केव्हाच उडत गेला होता. म्हैस पाण्यात गेली, तेव्हाच तो समजला, आपली मोटार गेली!

***

# इमानबहाद्दर

एका गावात होता एक दुकानदार. त्याचं दुकान मोठं होतं, तसं घरही टोलेजंग होतं. दुकान चांगलं चालत होतं, त्यामुळं त्याच्याजवळ पैसाही खूप होता. शिवाय भारी भारी कपडे, मौल्यवान वस्तू आणि दागदागिने यांचीही रेलचेल होती. मागावी ती वस्तू घरात येऊन पडत होती. कशाला तोटा नव्हता.

गावातली किती तरी मुलंमाणसं या घरात आली की त्यांना तिथली ही वस्तू उठवावी की ती वस्तू उठवावी असा मोह पडे. त्यामुळं त्या घरात खूप चोऱ्या होऊ लागल्या. आळ घेणार तरी कुणावर? लक्ष ठेवणार तरी कुणावर? म्हणून मग घरमालकानं काय केलं? एक भला मोठा कुत्रा आणून दारात बांधला. त्याचा पहारा एवढा कडक होता की चिमण्या आणि कावळे सुद्धा घरात येईनासे झाले.

आता कुत्रा म्हणजे तुम्हांला ठाऊकच आहे. जगातील सर्व प्राण्यांत जास्त इमानी. प्राण देईल, पण इमान सोडणार नाही. अनोळखी माणसाला तर घरात येऊच देणार नाही. भुंकत सुटणार. मालकानं आवरला तरच गप्प बसणार.

तर असा हा कुत्रा घरात आल्यापासून त्या घरातल्या चोऱ्या एकदम थांबल्या. कारण बाहेरच्या कुणाही माणसानं घरातल्या वस्तूला नुसता हात लावला तरी हा भुंकत सुटणार. मग तो चोर असो की नसो. म्हणूनच चोरांचा तो कर्दनकाळ बनला.

पण चोरांचा कर्दनकाळ असला तरी घरातल्या प्रत्येक माणसाचा मित्र. मग ते लहान मूल असो की म्हातारंकोतारं असो. प्रत्येकाशी तो खेळणार, बागडणार आणि सोबत पण करणार. बाहेर पहारा करून पुन्हा

घरातल्या माणसांची करमणूक करायला केव्हाही तयार आणि याचा खच काही नाही. काय एवढंसं खाणं द्याल तेवढंच. माणूस पहारेकरी म्हटला की त्याला पगार, कपडालत्ता, खाणं– द्याल तेवढं थोडं. कुत्र्याला पगार तर नकोच, पण कपडा तर अजिबात नको!

त्याला खाणंसुद्धा जास्त दिलं तर सुस्ती येते, अंगात आळस भरतो आणि पहारा करण्याऐवजी मग तो झोपा काढतो. जिथे तिथे लोळत राहतो. भुंकत नाही. त्यामुळं चोराला त्याची भीती उरत नाही. उपयोग काय? खायला काळ नि भुईला भार!

त्यामुळंच घरमालकानं या कुत्र्याला खाणं जास्त घालायचं नाही असं ठरवलं. घरातल्या माणसांना त्याचे जादा लाड करायचे नाहीत अशी सक्त ताकीद देऊन ठेवली. भुकेला कुत्रा जास्त भुंकतो. कारण पोटात भूक असल्यामुळं तो सारखा चिडत राहतो. आणि आपली सगळी चीड परकी माणसांवर, चोरापोरांवर काढतो.

हा कुत्रा तर चांगला धिप्पाड होता. वाघासारखा दिसायचा आणि लांबून पाहिलं तर वाघच वाटायचा. म्हणूनच मालकानं त्याचं नावही वाघ्या ठेवलं होतं. पण मालकानं दिलेल्या भाकरतुकड्यावर त्याचं पोट भरत नसे. मग तो सारखा कुरकुरत राही. म्हणजे जरा काही झालं की आपला भुंकत राही.

त्या गावापलीकडच्या गावात चोरांची एक जोडी होती. ते काय करायचे? एकानं लक्ष ठेवायचं, आणि दुसऱ्यानं चोरी करायची अशी त्यांची चोरीची पद्धत होती. त्यातल्या लक्ष ठेवणाऱ्या चोरानं वाघ्यावर बरोबर लक्ष ठेवलं होतं. वाघ्याला घरात खाणं पोटभर मिळत नाही, म्हणून आपली भाकरीची थाळी घेऊन तो वेळीअवेळी घरभर नाचत राही. पण थाळी घेऊन तो कितीही बोंबलत राहिला तरी घरातली माणसं त्याला आणखीन खाणं देत नसत. एवढी माहिती लक्ष ठेवणाऱ्या चोरानं मिळवली होती.

मग त्यानं काय केलं? एक दिवस खिशात दोन भाकऱ्या घेऊन तो त्या घरापाशी आला, आणि फाटकाबाहेर रेंगाळत राहिला. दुपारची वेळ

# इमानबहाद्दर

एका गावात होता एक दुकानदार. त्याचं दुकान मोठं होतं, तसं घरही टोलेजंग होतं. दुकान चांगलं चालत होतं, त्यामुळं त्याच्याजवळ पैसाही खूप होता. शिवाय भारी भारी कपडे, मौल्यवान वस्तू आणि दागदागिने यांचीही रेलचेल होती. मागावी ती वस्तू घरात येऊन पडत होती. कशाला तोटा नव्हता.

गावातली किती तरी मुलंमाणसं या घरात आली की त्यांना तिथली ही वस्तू उठवावी की ती वस्तू उठवावी असा मोह पडे. त्यामुळं त्या घरात खूप चोऱ्या होऊ लागल्या. आळ घेणार तरी कुणावर? लक्ष ठेवणार तरी कुणावर? म्हणून मग घरमालकानं काय केलं? एक भला मोठा कुत्रा आणून दारात बांधला. त्याचा पहारा एवढा कडक होता की चिमण्या आणि कावळे सुद्धा घरात येईनासे झाले.

आता कुत्रा म्हणजे तुम्हांला ठाऊकच आहे. जगातील सर्व प्राण्यांत जास्त इमानी. प्राण देईल, पण इमान सोडणार नाही. अनोळखी माणसाला तर घरात येऊच देणार नाही. भुंकत सुटणार. मालकानं आवरला तरच गप्प बसणार.

तर असा हा कुत्रा घरात आल्यापासून त्या घरातल्या चोऱ्या एकदम थांबल्या. कारण बाहेरच्या कुणाही माणसानं घरातल्या वस्तूला नुसता हात लावला तरी हा भुंकत सुटणार. मग तो चोर असो की नसो. म्हणूनच चोरांचा तो कर्दनकाळ बनला.

पण चोरांचा कर्दनकाळ असला तरी घरातल्या प्रत्येक माणसाचा मित्र. मग ते लहान मूल असो की म्हातारंकोतारं असो. प्रत्येकाशी तो खेळणार, बागडणार आणि सोबत पण करणार. बाहेर पहारा करून पुन्हा

घरातल्या माणसांची करमणूक करायला केव्हाही तयार आणि याचा खर्च काही नाही. काय एवढंसं खाणं द्याल तेवढंच. माणूस पहारेकरी म्हटला की त्याला पगार, कपडालत्ता, खाणं– द्याल तेवढं थोडं. कुत्र्याला पगार तर नकोच, पण कपडा तर अजिबात नको!

त्याला खाणंसुद्धा जास्त दिलं तर सुस्ती येते, अंगात आळस भरतो आणि पहारा करण्याऐवजी मग तो झोपा काढतो. जिथे तिथे लोळत राहतो. भुंकत नाही. त्यामुळं चोराला त्याची भीती उरत नाही. उपयोग काय? खायला काळ नि भुईला भार!

त्यामुळंच घरमालकानं या कुत्र्याला खाणं जास्त घालायचं नाही असं ठरवलं. घरातल्या माणसांना त्याचे जादा लाड करायचे नाहीत अशी सक्त ताकीद देऊन ठेवली. भुकेला कुत्रा जास्त भुंकतो. कारण पोटात भूक असल्यामुळं तो सारखा चिडत राहतो. आणि आपली सगळी चीड परकी माणसांवर, चोरापोरांवर काढतो.

हा कुत्रा तर चांगला धिप्पाड होता. वाघासारखा दिसायचा आणि लांबून पाहिलं तर वाघच वाटायचा. म्हणूनच मालकानं त्याचं नावही वाघ्या ठेवलं होतं. पण मालकानं दिलेल्या भाकरतुकड्यावर त्याचं पोट भरत नसे. मग तो सारखा कुरकुरत राही. म्हणजे जरा काही झालं की आपला भुंकत राही.

त्या गावापलीकडच्या गावात चोरांची एक जोडी होती. ते काय करायचे? एकानं लक्ष ठेवायचं, आणि दुसऱ्यानं चोरी करायची अशी त्यांची चोरीची पद्धत होती. त्यातल्या लक्ष ठेवणाऱ्या चोरानं वाघ्यावर बरोबर लक्ष ठेवलं होतं. वाघ्याला घरात खाणं पोटभर मिळत नाही, म्हणून आपली भाकरीची थाळी घेऊन तो वेळीअवेळी घरभर नाचत राही. पण थाळी घेऊन तो कितीही बोंबलत राहिला तरी घरातली माणसं त्याला आणखीन खाणं देत नसत. एवढी माहिती लक्ष ठेवणाऱ्या चोरानं मिळवली होती.

मग त्यानं काय केलं? एक दिवस खिशात दोन भाकऱ्या घेऊन तो त्या घरापाशी आला, आणि फाटकाबाहेर रेंगाळत राहिला. दुपारची वेळ

होती. म्हणजे जेवणंबिवणं उरकून घरातली माणसं घरात निवांत झोपली होती. घरमालक आपल्या दुकानात आणि मुलं शाळेत. त्यामुळं घराच्या पुढील जागेत वाघ्या एकटाच माशा मारीत बसला होता.

एवढ्यात काय झालं? समोरच्या बागेत काही तरी वाजलं. धपकन आवाज आला. तो ऐकल्यावर वाघ्यानं कान टवकारले. चौफेर पाहिलं आणि जिकडून आवाज आला तिकडे धावत सुटला. वास काढीत ती वस्तू त्यानं बरोबर शोधून काढली. ती निघाली ताजी खमंग भाकरी. शिळीपाकी पण नव्हे. जमिनीवर उभी पडल्यामुळं भाकरीचे तुकडे झाले होते. बागेच्या हिरवळीवर ते सर्वत्र विखुरले होते.

मग काय विचारता? वाघ्याला दुसरं काय हवं होतं? त्यानं त्या सगळ्या तुकड्यांचा फन्ना उडवला. नखाएवढा तुकडा सुद्धा कुठे शिल्लक ठेवला नाही. ते सर्व संपल्यावरच त्याची मान वर गेली. कुठून आली ही मस्त मोठी भाकरी? अशीच आणखी एखादी मिळेल का? म्हणून त्यानं चौफेर नजर टाकली.

आणि अचानक त्याचं लक्ष फाटकाबाहेर गेलं. तर तिथे तो लक्ष ठेवणारा चोर उभा. कुत्र्याचं लक्ष आपल्याकडे जातंय कधी आणि आपण खिशातली भाकरी काढतोय कधी याची तो वाट बघत होता. ते जाताच त्यानं खिशातली दुसरी भाकरी काढली आणि वाघ्याकडे फेकली. वाघ्यानं तीही गट्टम करून मान वर केली आणि आपणाला दोन भाकऱ्या देणाऱ्या फाटकाबाहेरच्या त्या माणसाकडे पुन्हा पाहिलं.

वाघ्या बघत होता, हा आणखी एखादी भाकरी टाकतोय का? पण लक्ष ठेवणाऱ्या चोराजवळ आणखी भाकरी नव्हती. त्यानं वाघ्याला आज तेवढीच म्हणून सांगितलं, टाटा केलं आणि एवढी ओळख पुरे म्हणून तो निघून गेला.

पण दुसऱ्या दिवशी बरोबर त्याच वेळी चोर पुन्हा तिथे आला. तसाच फाटकाबाहेर रेंगाळत राहिला. वाघ्या दिसताच त्यानं कालच्यासारखीच पुन्हा एक भाकरी टाकली. कुत्र्यानं ती लगेच टिपली, खाऊन फस्त केली आणि पुन्हा दुसऱ्या भाकरीसाठी मान वर केली. फाटकापलीकडे पाहिलं.




पण भाकरी टाकणारा आज दुसराच इसम होता. हा लक्ष ठेवणारा चोर नव्हता. हा होता चोरी करणारा– दुसरा– खरा चोर! हा होता उंचाड्या. याचं तोंडही लांबोडं होतं. आणि हा वाघ्याकडे पाहून एकटाच हसत होता. वाघ्याशी ओळख असल्यासारखा.

पण वाघ्याला ओळख नको होती. त्याला हवी होती असली तर आणखी भाकरी. त्यानं ती फेकली तशी यानं एक उंच उडी मारून ती पकडली आणि गट्टम करून टाकली. पुन्हा वाघ्यानं मान वर केली, तसं या चोरानंही त्याला टाटा केलं आणि तो निघून गेला. वाघ्यानं उगीच फाटकापर्यंत एक फेरी मारली. पण खरा चोर थांबला नाही. हसलाबिसला आणि निघून गेला.

तिसऱ्या दिवशी पुन्हा पहिल्या दिवशीचा म्हणजे लक्ष ठेवणारा चोर आला. आजही तो दोन भाकऱ्या देऊन आणि ओळख वाढवून गेला. चौथ्या दिवशी पुन्हा दुसऱ्या दिवशीचा म्हणजे चोरी करणारा चोर आला. तशाच दोन भाकऱ्या देऊन गेला. असं काही दिवस चालू होतं. भाकऱ्या खाऊन झाल्या की वाघ्या फाटकाशी जाऊन बघे. तो जाई आणखी भाकरी मिळते का ते बघायला. चोरांना वाटे, आपण

होती. म्हणजे जेवणंबिवणं उरकून घरातली माणसं घरात निवांत झोपली होती. घरमालक आपल्या दुकानात आणि मुलं शाळेत. त्यामुळं घराच्या पुढील जागेत वाघ्या एकटाच माशा मारीत बसला होता.

एवढ्यात काय झालं? समोरच्या बागेत काही तरी वाजलं. धपकन आवाज आला. तो ऐकल्यावर वाघ्यानं कान टवकारले. चौफेर पाहिलं आणि जिकडून आवाज आला तिकडे धावत सुटला. वास काढीत ती वस्तू त्यानं बरोबर शोधून काढली. ती निघाली ताजी खमंग भाकरी. शिळीपाकी पण नव्हे. जमिनीवर उभी पडल्यामुळं भाकरीचे तुकडे झाले होते. बागेच्या हिरवळीवर ते सर्वत्र विखुरले होते.

मग काय विचारता? वाघ्याला दुसरं काय हवं होतं? त्यानं त्या सगळ्या तुकड्यांचा फन्ना उडवला. नखाएवढा तुकडा सुद्धा कुठे शिल्लक ठेवला नाही. ते सर्व संपल्यावरच त्याची मान वर गेली. कुठून आली ही मस्त मोठी भाकरी? अशीच आणखी एखादी मिळेल का? म्हणून त्यानं चौफेर नजर टाकली.

आणि अचानक त्याचं लक्ष फाटकाबाहेर गेलं. तर तिथे तो लक्ष ठेवणारा चोर उभा. कुत्र्याचं लक्ष आपल्याकडे जातंय कधी आणि आपण खिशातली भाकरी काढतोय कधी याची तो वाट बघत होता. ते जाताच त्यानं खिशातली दुसरी भाकरी काढली आणि वाघ्याकडे फेकली. वाघ्यानं तीही गट्टम करून मान वर केली आणि आपणाला दोन भाकऱ्या देणाऱ्या फाटकाबाहेरच्या त्या माणसाकडे पुन्हा पाहिलं.

वाघ्या बघत होता, हा आणखी एखादी भाकरी टाकतोय का? पण लक्ष ठेवणाऱ्या चोराजवळ आणखी भाकरी नव्हती. त्यानं वाघ्याला आज तेवढीच म्हणून सांगितलं, टाटा केलं आणि एवढी ओळख पुरे म्हणून तो निघून गेला.

पण दुसऱ्या दिवशी बरोबर त्याच वेळी चोर पुन्हा तिथे आला. तसाच फाटकाबाहेर रेंगाळत राहिला. वाघ्या दिसताच त्यानं कालच्यासारखीच पुन्हा एक भाकरी टाकली. कुत्र्यानं ती लगेच टिपली, खाऊन फस्त केली आणि पुन्हा दुसऱ्या भाकरीसाठी मान वर केली. फाटकापलीकडे पाहिलं.




पण भाकरी टाकणारा आज दुसराच इसम होता. हा लक्ष ठेवणारा चोर नव्हता. हा होता चोरी करणारा– दुसरा– खरा चोर! हा होता उंचाड्या. याचं तोंडही लांबोडं होतं. आणि हा वाघ्याकडे पाहून एकटाच हसत होता. वाघ्याशी ओळख असल्यासारखा.

पण वाघ्याला ओळख नको होती. त्याला हवी होती असली तर आणखी भाकरी. त्यानं ती फेकली तशी यानं एक उंच उडी मारून ती पकडली आणि गट्टम करून टाकली. पुन्हा वाघ्यानं मान वर केली, तसं या चोरानंही त्याला टाटा केलं आणि तो निघून गेला. वाघ्यानं उगीच फाटकापर्यंत एक फेरी मारली. पण खरा चोर थांबला नाही. हसलाबिसला आणि निघून गेला.

तिसऱ्या दिवशी पुन्हा पहिल्या दिवशीचा म्हणजे लक्ष ठेवणारा चोर आला. आजही तो दोन भाकऱ्या देऊन आणि ओळख वाढवून गेला. चौथ्या दिवशी पुन्हा दुसऱ्या दिवशीचा म्हणजे चोरी करणारा चोर आला. तशाच दोन भाकऱ्या देऊन गेला. असं काही दिवस चालू होतं. भाकऱ्या खाऊन झाल्या की वाघ्या फाटकाशी जाऊन बघे. तो जाई आणखी भाकरी मिळते का ते बघायला. चोरांना वाटे, आपण

त्याला दररोज भाकरी घालतो, त्यामुळे दोस्ती वाढवण्यासाठी, आपणाला भेटण्यासाठीच तो पुढं येतो. दोघेही चोर त्याला आंजारीत गोंजारीत, ओळख वाढवीत आणि आपण किती चांगले आहोत हे दाखवीत निघून जात.

मग एक दिवस काय झालं? लक्ष ठेवणारा चोर पुढं आला. नेहमीप्रमाणं त्यानं वाघ्याच्या पुढ्यात भाकरी टाकली. पण वाघ्या ती खाण्यात दंग असतानाच दुसरा म्हणजे खरा चोर फाटकातून आत आला. वाघ्याला वाटलं, त्यानंच भाकरी टाकलीय. म्हणून त्यानं त्याला सोडून दिलं आणि भाकरी खात बसला. खरा चोर घरात केव्हा निघून गेला ते त्याला कळलंच नाही.

तिकडे लक्ष ठेवणाऱ्या चोरानं आज भरपूर भाकऱ्या आणल्या होत्या. कशासाठी कळलं ना? वाघ्यानं त्या खाण्यात दंग राहावं आणि खऱ्या चोराला घरात जाऊन चोरी करायला भरपूर सवड द्यावी म्हणून. वाघ्याला काही कळण्याच्या आत खऱ्या चोराला चोरी करून बाहेर सटकता आलं पाहिजे म्हणून!

खऱ्या चोरानं काय केलं? घरातली सगळी माणसं डाराडूर झोपली होती. त्याचं चांगलंच फावलं. इकडेतिकडे शोधून त्यानं कपाटाच्या चाव्या मिळवल्या. हळूच कपाट उघडलं. दागदागिने, पैसाअडका काय मिळेल ते घेतलं. पण ते त्याच्या चारी खिशांत मावेना. पण जे मावत नाही त्याचा मोह त्याला सोडवेना. त्याला वाटलं, कुत्रा आता आपल्या चांगला वगीचा झालाय. पुढ्यात भाकरीचा तुकडा टाकला की तो कशाला बघतोय जास्त? म्हणून त्यानं काय केलं? त्याच कपाटावरची एक रिकामी बॅग घेतली. चोरीची सगळी लूट त्यात भरली आणि ती घेऊन तो आपल्याच बापाचं घर असल्याच्या ऐटीत बाहेर पडला.

बाहेर वाघ्या आपला चोरानं फेकलेले भाकरीचे तुकडे ओरपतोय. तिकडून लक्ष ठेवणारा चोर फेकतोय आणि हा खातोय. पण तेवढ्यात त्याच्या पुढ्यातले भाकरीचे तुकडे संपले. म्हणून त्यानं आणखी भाकरीसाठी मान वर केली. तर काय? घरातून खरा चोर बाहेर पडतोय.

त्याला हे कळेना की, भाकऱ्या टाकण्याची कामगिरी तिकडे तो दुसरा इसम करतोय. मग हा इकडे काय करतोय? एवढ्यात त्याचं लक्ष चोराच्या हातातल्या बॅगेवर गेलं. ही तर आपल्या घरातली बॅग. ती यानं कशाला बाहेर आणलीय? त्याला काही तरी संशय आला, शंका आली. आणि शंका आली की स्वस्थ बसेल तो कुत्रा कसला? आधी तो उगीच थोडा गुरगुरला, थोडं भुंकल्यासारखं. पण चोराच्या मनात चांदणं. चोर त्या तेवढ्या भुंकण्यानंच टरकला. त्याचा चेहरा एकदम चिरकला. वाघ्यानं ते पाहिलं मात्र, त्याचा आवाज एकदम चढला.

भुः भुः भुः भुः!– सुरू! त्याबरोबर काय? खऱ्या चोरानं तिथून पाय काढला. तेवढ्यावरही वाघ्यानं त्याला सोडून दिलं असतं. पण पळाला तरी ती लुटीची बॅग तो सोडायला तयार नव्हता. मग वाघ्या त्याला कसा सोडील?

तो भाकरीबिकरी ते सगळं विसरला आणि बॅग उठवणाऱ्या चोराच्या मागं लागला. लक्ष ठेवणाऱ्या चोरानं वाघ्याला अडवण्याचा, गोड बोलून चुचकारण्याचा खूप प्रयास केला. खिशातली एक भाकरी पण पुढ्यात टाकली. पण छेः! वाघ्यानं तिकडे पाहिलं पण नाही.



आता तिथे आजूबाजूचे लोक जमा झाले. ते पाहून चोर जास्तच पळत सुटला. रस्ता सोडून त्यानं जंगलाची आडवाट पकडली. पण वाघ्या त्याची पाठ सोडायला तयार नाही. झाडझुडुप, खाचखळगे, काटेकुटे– त्याला कसली पर्वा नव्हती. बघता बघता चोराला गाठून त्यानं त्याचा पायच

पकडला. चोर सपशेल उताणा पडला. हातातली बॅग त्यानं टाकली, तेव्हाच वाघ्यानं त्याचा पिच्छा सोडला आणि बॅग ताब्यात घेतली. त्यानं त्या बॅगेची मूठ तोंडात पकडली. ती घेऊन तो निघाला. पण बॅग जड होती. मूठ तोंडात पकडून त्याला नीट चालता येईना. तेव्हा त्यानं काय केलं? बॅग खाली ठेवली आणि तो तिच्यावर पाय रोवून भुंकू लागला. आपल्या मालकाला हाका मारू लागला.

आजूबाजूला आता शेकडो माणसं जमा झाली होती. पण पुढं येण्याची कुणाची टाप नव्हती. वाघ्या वाघासारखा तिथे ठाण मांडून उभा होता.

शेवटी वाघ्याच्या घरमालकाला ही बातमी कळली. तो धावत तिथे आला तेव्हा कुठे वाघ्याचं भुंकणं थांबलं. घरमालकानं ती बॅग उचलून घेतली. दुसऱ्या हातानं वाघ्यालाही उचलून घेतलं. अगदी घरापर्यंत उचलून आणलं. वाघ्या आनंदानं नुसता फुलला होता. घरमालक मोठ्या खुषीनं म्हणत होते, "वाघ्या, आज आपण तुला पुरणपोळी, श्रीखंडपुरी, जिलबी– काय म्हणशील ते देणार."

वाघ्याला मालकाचं हे म्हणणं कळलं असतं तर? तर तो म्हणाला असता, "मालक, आपणाला तुमची पुरणपोळी , श्रीखंडपुरी, जिलबी– तसलं काही नाही लागत. आपण आपल्या माणसावर प्रेम करतो. खाण्यावर नाही! जो खाणं देईल त्याचा गोंडा घोळतात ती माणसं! आम्ही नाही!"

***

३०६०५
9/12/2002

# लवंगी मिरची

एक होती कुत्री, तिचं नाव लवंगी मिरची. असली तिखट की भुंकायला लागली की समोर वाघ आला तरी थांबणार नाही. एकदा तर तिनं वाघालाच पळवून लावलं. तिथे इतरांचं काय?

वाघाला कसं पळवलं माहीत आहे का? मध्यरात्रीची वेळ. दाट काळोखात ही एकटीच बसली होती घराबाहेर पहारा करीत. मालक, मालकीण, मुलं-बाळं घरात डाराडूर झोपलेली. तिकडून आला वाघ. हिला पाहिल्यावर त्याच्या तोंडाला सुटलं पाणी, चॉकलेट दिसल्यावर आपल्या तोंडाला कसं सुटतं? तसं. म्हणाला, एवढीशी तर आहे. करून टाकू चट्टामट्टा. दोन मिनिटांत पाडू फडशा!

पण लवंगीनं काय केलं? वाघ समोर आला तरी डगमगली नाही. वाघानं हिला पकडण्यापूर्वी हिनंच त्याच्या पाठीवर उडी घेतली. आणि त्याच्या कानाला अशी कडकडून चावली– वाघानं तिची तोंडात आलेली तंगडी सोडून दिली. तशी लवंगी सटकली आणि पळून गेली.

वाघाचा कान रक्तबंबाळ झाला होता. एवढी फजिती झाल्यावर तो कशाला थांबतो? कुत्री कुठे गेली तेही त्यानं पाहिलं नाही. निमूटपणं तो निघून गेला.

घरमालकांनी माडीवरून लवंगीची वाघाशी झालेली ही झटापट पाहिली. ते ताबडतोब खाली आले. तर वाघ निघून गेलेला, आणि लवंगी परत येऊन दारात उभी. तिचा हा पराक्रम पाहून मालक तिला डोक्यावर घेऊन नाचले. त्या दिवसापासून त्यांनी तिचं नाव ठेवलं 'लवंगी मिरची.' त्यांनी तिच्यावर एक गाणंच केलं–

*लवंगी मिरची अमच्या घरची*
*वाघाशी लढली कानाला डसली*
*वाघाची केली ऐशी की तैशी!*

त्या घरात राहून लवंगीनं असे अनेक पराक्रम केले. सरपटत येणारा साप असो की दोन पायांचा चोर असो, लवंगी त्याला बाहेरच्या बाहेर फुटवायची. घरापर्यंत फिरकूच द्यायची नाही. अनोळखी माणूस दिसलं रे दिसलं की सुटली भुंकत. मग तो केवढा का असेना.

असाच एक नवखा माणूस आला. लवंगीनं त्याला कधी पाहिलंच नव्हतं. ही जी भुंकत सुटली ती थांबायलाच तयार नाही. शेवटी मालकांनी लवंगीला साखळीत अडकवलं आणि त्या माणसाला घरात घेतलं. लवंगी तरीही गुरगुरत होती. मालकांनी तिला दटावून विचारलं, "कुरकुरते कशाला ग? मी त्यांना घरात घेतलं, म्हणजे माणूस आपलं आहे– कळत नाही का तुला?"

लवंगी म्हणाली, "ते कळतं हो! पण काही माणसं आपली वाटली तरी ती आपली नसतात. लबाड असतात. मला हा माणूस तसलाच वाटतो. त्याला मी काय करू? तो माणूस लबाड नाही अशी खात्री पटेपर्यंत मला गुरगुरत राहायलाच हवं. माझं तुझ्यावर चांगलं लक्ष आहे हे त्याला दाखवायलाच हवं. माझं ते कामच आहे!"

पण हे सर्व ती सांगत होती आपल्या भाषेत. म्हणजे भुंकत. कुत्र्यांची भाषा तीच ना? गोड बोलायचं, भांडायचं, समजावून सांगायचं– काही असलं तरी त्या एका भाषेत. पण मालकांना काय वाटलं, ही नुसतीच भुंकतेय– आपण एवढं दटावलं तरी. म्हणून त्यांनी तिच्या पाठीत एक चापट लगावली आणि तिला गप्प बसवलं.

लवंगीला आला राग. म्हणाली, "आत्ता मी बसते गप्प, पण वेळ आली की दाखवून देईन." पण हे ती मनातच म्हणाली. मोठ्यानं बोलायचं म्हणजे भुंकायचं ना? म्हणजे आणखी मार मिळायचा. म्हणून ते सर्व मनात ठेवून ती गप्प बसली.


त्यानंतर काही दिवस गेल्यावर तोच मनुष्य तिच्या मालकांकडे परत

आला. लवंगीनं भुंकून त्याला घाबरवून सोडलं. ती त्याला बाहेरच्या बाहेर फुटवायला बघत होती. पण तेवढ्यात मालक आले. त्यांनी त्या माणसाला घरात घेतलं. या वेळी लवंगी अजिबात गुरगुरली नाही. पण तिचा एक डोळा त्याच्यावर होताच. ते त्याला कळलंच नाही.

त्या माणसानं काय केलं? मालकांशी गप्पा बिप्पा मारल्या. चिवडा खाल्ला, चहा प्यायला. पण मालक घरात गेले हे पाहून त्यानं टेबलावर पडलेलं घड्याळ पटकन आपल्या खिशात घातलं. मग काय? लवंगी टपूनच बसली होती. ती जी भुंकत सुटली ती जाम थांबायला तयार नाही.

त्याबरोबर मालक बाहेर आले. मालकीणबाई आल्या. त्यांची मुलं आली. सर्वांनी तिला गप्प बसवण्याचा खूप प्रयत्न केला. पण लवंगी जाम ऐकायला तयार नाही. तो माणूस लटलट कापायला पण लागला होता. पण तेवढ्यात मालकांनी लवंगीला वर उचलूनच घेतलं. त्याबरोबर तो माणूस बाहेर पडला. बाहेर गेल्यावर तर तो पळतच सुटला. तशी लवंगीनं सगळं बळ एकवटून मालकांच्या हातातून दाणकन उडी मारली आणि सुटली त्या माणसाच्या मागावर.

त्या माणसानं नेहमीचा रस्ता सोडून दुसरीच वाट पकडली. पण तो माणूस कुठल्याही वाटेनं गेला तरी त्याच्या पायांचा वास कुठे जाणार होता? लवंगी त्या वासाच्या वाटेनंच निघाली आणि तिनं त्या माणसाला



बरोब्बर शोधून काढलं. उडी मारून तिनं त्याची पँटच तोंडात घातली. तो जाणार कुठे?

तिच्या मागोमाग तिचे मालक-मालकीण आणि त्यांची मुलं सगळी धावत बाहेर आली. त्या माणसाच्या फजितीला पारावार उरला नाही. त्यानं निमूटपणे खिशात घातलेलं घड्याळ लवंगीच्या मालकांना परत केलं, तेव्हाच लवंगीनं त्याची पँट सोडली.

लवंगीची ही बहाद्दरी ऐकून चोरांनी त्या घराचं नावच सोडून दिलं. बाकी लोक मात्र तिच्यावर जाम खूष! प्रत्येकाला वाटायचं, अशी एक लवंगी मिरची आपल्या घरी असावी. पण ती आणणार कुठून? ती काय बाजारात मिळणारी वस्तू आहे? टाकले पैसे, आणली घरी– अशी?

एका माणसानं तर कहरच केला. त्यानं मोटारीत घालून लवंगीला पळवून नेलं. वीस मैल लांब. हा माणूस लवंगीच्या मालकांकडे नेहमी येणारा. तो होता व्यापारी. तिचे एकेक पराक्रम तो रोज ऐकत होता. त्याला ती फारच आवडली होती. पण त्याला माहीत होतं ही कुत्री काही तिचे मालक आपणाला देणार नाहीत. हजारो रुपये दिले तरी सोडणार नाहीत.

तेव्हा त्या व्यापाऱ्यानं काय केलं? आधी लवंगीशी दोस्ती केली. तिला दर खेपेला तो कसला कसला एकेक खाऊ आणून देऊ लागला. बटर, टोस्ट, सँडविच– दर खेपेला नवा पदार्थ. त्यामुळं झालं काय? लवंगी त्या माणसावर एकदम खूष. ती रोज त्याची वाटच पाहत बसायची. त्याचाच काय, पण त्याच्या मोटारीचाही आवाज ती बरोबर ओळखायची. अर्ध्या वाटेत त्याची मोटार अडवून खाऊ मागायची.

अशीच एक दिवस ती धावत बाहेर आली. त्याच्या मोटारीचा हॉर्न ऐकून. तशी त्या व्यापाऱ्यानं काय केलं? सँडविच दाखवून तिलाच मोटारीत घेतलं, आणि मोटार मागं फिरवून आपल्या घरी घेऊन गेला. वीस मैल लांब. मध्ये बारा गावं, चार नद्या आणि शेकडो रस्ते. कुठला रस्ता कुठे जातो कुणाला ठाऊक? लवंगीला त्यात काय कळणार?

व्यापाऱ्यानं मोटार थेट आपल्या घरी आणून थांबवली. लवंगी मोटारीत

काही बोलली नाही. पण मोटारीतून उतरल्याबरोबर तिच्या लक्षात आलं, हे आपलं घर नव्हे. ही माणसं आपली नव्हेत. इथं आपलं कुणीच नाही. तिनं आत-बाहेर फिरून पाहिलं, हुंगून पाहिलं. पण काहीच कुठे ओळखीदेखीचं दिसेना. तशी ती बिथरली आणि भुंकत सुटली. पण किती भुंकलं तरी आपलं माणूस पुढं येत नव्हतं, आपलं घर दिसत नव्हतं. म्हणून ती आणखी भुंकत सुटली.

त्या घरच्या मालकीणबाईंनी मग काय केलं? जेवणाचं ताट लवंगीच्या पुढ्यात आणून ठेवलं. पण छेः! लवंगीनं त्याला तोंड पण लावलं नाही.

ती एका जागी थांबतच नव्हती. सैरभैर होऊन सगळीकडे फिरत होती. तोंडानं भुंकण्याचा सपाटा चालूच होता. व्यापाऱ्यानं तिला खूप चुचकारलं, लवंगी माझी 'बया भादुरी' म्हणून आंजारलं गोंजारलं, पण लवंगी त्याच्या हातातून निसटली.

व्यापारी पडला पेचात. आता ही पळून गेली तर काय करायचं? म्हणून त्यानं काढली साखळी. पण साखळी पाहिल्यावर लवंगी तिथं थांबलीच नाही. उडी मारून घराबाहेर पडली आणि धूम पळत सुटली. पाहता पाहता दिसेनाशी झाली. त्या घरच्या माणसांनी गावभर फिरून पाहिलं. स्वतः व्यापाऱ्यानं मोटार काढून आजूबाजूच्या चार गावांत शोधून पाहिलं. पण लवंगी कुठेही सापडली नाही.

तिकडे लवंगीच्या घरी मात्र भलतीच धावपळ उडाली होती. ही गेली कुठे? दुपार झाली, संध्याकाळ झाली तरी लवंगी घरी आली नाही. म्हणजे ही गेली कुठे? लवंगीचे घरमालक, त्यांची मुलं यांनी आपल्याही गावात सगळीकडे फिरून तपास केला. पण लवंगीचा पत्ता नाही.

ही एकाएकी अशी नाहीशी झालीच कशी? तिला कुणी काही बोललं होतं का, मारलं होतं का? सगळी चौकशी झाली. पण तसं काही कुणी केलेलंच नव्हतं. कुणाच्या मागून जाणारीही ती कुत्री नव्हती. कुणी पळवून नेलं तर भुंकून त्यालाच पळवून लावील असली ती कुत्री. आजूबाजूला कुणाकडे गेली तरी तिथं थांबणार नाही. मग हिचं झालं काय?

रस्त्यात मोटारी-बिटारीखाली नाही ना सापडली? या भीतीनं मुलांनी

गावातले मोटारींचे तिन्ही रस्ते शोधून पाहिले. पण तसं काही आढळलं नव्हतं. मग ही कुठे नाहीशी झाली?

शेवटी दिवेलागणीला अकस्मात तिचा आवाज आला. खणखणीत आवाजात ती भुंकत होती. म्हणजे हिला कुठे काही झालेलं लागलेलं दिसत नव्हतं. तिच्या भुंकण्यासरशी घरातली सगळी माणसं बाहेर आली. पाहतात तर लवंगीचं भुंकणं चालूच. झालं होतं काय? वाटेत एका मुलानं सायकल आडवी घालून तिची कळ काढली होती, म्हणून त्याच्यावर ती भुंकत होती. मालकांनी तिला थोपटलं आणि उचलून घरात आणलं.

लवंगी आली ही बातमी लगेच सर्वत्र पसरली. तशी आजूबाजूच्या घरांतली माणसं तिला पाहायला धावली. सर्वांचा एकच प्रश्न : दिवसभर ही होती कुठे? तिला कुठे काही लागलेलं नाही ना याची मालकांनी खात्री करून पाहिली. मालकीणबाईंनी पाठीवर हात फिरवून विचारलं, "ए फटाकडे, कुठं गेली होतीस ग दिवसभर उनाडायला?"

त्यांच्या एका मुलानं विचारलं, "कुणाच्या घरीबिरी गेली होतीस का? पाहुणी म्हणून?"

"का आई-बाबा भेटले वाटेत?"

"का रुसून बसली होतीस कुठे?"

"की जाऊन लग्न केलंस कुणाशी?"


असे दहा माणसांनी दहा प्रश्न विचारले. पण लवंगीनं कुणाच्या बोलण्याकडे लक्ष पण दिलं नाही. ती सरळ घरात गेली. तिनं आपली जेवणाची थाळी उचलली आणि ती मालकीण बाईंच्या पुढ्यात आणून आदळली. तेव्हा मालकीणबाई कळकळल्या. म्हणाल्या, "अग आई ग! केवढी भूक लागल्येय माझ्या बाळीला!"

लगेच त्या स्वैपाकघरात गेल्या आणि भातभाकरी घेऊन आल्या. लवंगीनं ती अधाशासारखी खाल्ली आणि थाळी जागेवर नेऊन टाकली. पलीकडे तिची पाण्याची पातेली होती, त्यात तोंड घालून लपालपा पाणी प्यायली. आणि सरळ जाऊन ओटीवरच्या आपल्या बिछान्यावर आरामात जाऊन पडली. घरातल्या शहाण्या मुलीसारखी.

तसं घरमालकांनी तिला जवळ घेऊन विचारलं, "ए लवंगी मिरची, अमच्याच घरची, आज तू रुसल्येयस का सांग बघू आमच्यावर? कुणी काय केलं का ते सांग बघू मला."

लवंगीला मालकांची ही भाषा बरोब्बर कळली. तिलाही त्यांना सगळं सांगायचं होतं. म्हणायचं होतं, "काय सांगू मालक तुम्हांला? तुमचा तो व्यापारी मित्र. त्यानं मला मोटारीत घालून पळवून नेलं. माहीत आहे? आपल्या घरी. तिथं मला तो काय काय एकेक खायला देत होता, मस्का लावत होता. पण मी म्हटलं, तू सोन्याची बिस्किटं दिलीस तरी मला नकोत. मी इथे थांबणार नाही. जिथून आणलंस तिथं मला नेऊन सोड. आत्ताच्या आत्ता. भुंकून भुंकून मी कित्ती परींनी त्याला हे सांगितलं. म्हटलं, मी इथे राहणार नाही. मला माझ्या मालकांकडे नेऊन सोड.

"तर त्यानं काय केलं माहीत आहे का? मला साखळीनं बांधून ठेवायला निघाला. म्हटलं, अबे हाट! आणि सरळ बाहेरचा रस्ता पकडला. वाट मला पाठच होती. ज्या मोटारीतून गेले त्याच मोटारीचा वास काढीत परत यायचं. वाट चांगली होती. गुळगुळीत आणि तुळतुळीत. पण मध्ये मध्ये आमची कुत्रे कंपनी भेटायची ना? प्रत्येक जण घरी चल, एक दिवस तरी राहा ग– म्हणत होता. पण जाम एकालाही दाद दिली नाही.



म्हटलं, माझे मालक घरी वाट बघत असतील. असं करून फुटवलं एकेकाला. म्हणून एवढा उशीर झाला. नाही तर मी केव्हाच आले असते.''

अशी सगळी हकीगत तिला मालकांना सांगायची होती. पण सांगणार कशी? आपली भाषा भुंकायची. मालकांना ती कळणार कशी? ते म्हणणार, ही आपल्यावरच भुंकायला लागली की काय? म्हणूनच ती गप्प बसली होती.

तिसऱ्या दिवशी तो व्यापारी त्या घरी परत आला, तेव्हा खरी गोष्ट कळली. तो आधी लवंगीला पाहून गार झाला. ही इथं परत आली कशी तेच त्याला कळेना. तो खरं तर तुमच्या लवंगीला आपण पळवलं हे सांगणारच नव्हता. पण तो आल्याबरोबर लवंगी त्याच्या अंगावर भुंकतच सुटली. मग करतो काय? सर्व हकीगत सांगणं भागच होतं.

ती सांगून झाल्यावर त्यानं लवंगीच्या मालकांची सपशेल माफी मागितली. म्हणाला, ''लवंगीला मी मोटारीतून पळवलं. मी असं करायला नको होतं. मला क्षमा करा. माझ्या हातून चूक झाली.'' असं म्हणून त्यानं मालकांचे पाय धरले.

आणि काय आश्चर्य? लवंगी लगेच भुंकायची थांबली. मालकांनी तिला उचलून छातीशी घेतलं. म्हणाले, ''लवंगी, तुझ्या इमानाला तोड नांही!''

***

# अंजूची मंजू

*एक होती अंजू– एक होती मंजू*
*अंजू होती मुलगी– मंजू होती मांजरी*
*अंजूचे डोळे निळे गर्द– मंजूचे डोळे हिरवे जर्द*
*अंजूला कपड्यांची भारी हौस– मंजूला आवडायचा मिकी माउस!*

–हिला तिच्याशिवाय आणि तिला हिच्याशिवाय जाम करमायचं नाही. ही शाळेत गेली की ती हाका मारीत बसणार– म्यांव म्यांव! म्यांव म्यांव! ती कुठे दिसली नाही तर ही हाका मारीत सुटणार– ए मिनी माव! ए मिनी माव!

एक दिवस काय झालं? अंजूच्या शाळेत मंजू पण गेली. गुपचुप जाऊन वर्गात बसली.

सरांनी विचारलं, "तू ग कोण?"

तर ही म्हणाली, "म्यांव म्यांव! दुसरं कोण?"

मुलांनी विचारलं, "तुझं नाव ग काय?"

ही म्हणाली, "म्यांव म्यांव! दुसरं काय?"

अंजूनं विचारलं, "माझ्या मागनं आलीस कशाला?"

मंजू म्हणाली, "खेळायला! दुसरं कशाला?"

मंजूची उत्तरं ऐकून वर्गातली मुलं झाली खूष आणि लागली तिच्याशीच खेळायला. सरांनी तर तिला उचलून घेतलं आणि लागले तिचीच गोष्ट करून सांगायला. सर्वांशी झाली गट्टी, अभ्यासाला पडली सुट्टी!

संध्याकाळी हे कळलं अंजूच्या बाबांना. तेव्हा ते रागावले. मंजूला म्हणाले, "कार्टे, अभ्यास बुडवलास सर्वांचा. देऊ का कुल्यावर फटका?"

म्हटलं, माझे मालक घरी वाट बघत असतील. असं करून फुटवलं एकेकाला. म्हणून एवढा उशीर झाला. नाही तर मी केव्हाच आले असते.''

अशी सगळी हकीगत तिला मालकांना सांगायची होती. पण सांगणार कशी? आपली भाषा भुंकायची. मालकांना ती कळणार कशी? ते म्हणणार, ही आपल्यावरच भुंकायला लागली की काय? म्हणूनच ती गप्प बसली होती.

तिसऱ्या दिवशी तो व्यापारी त्या घरी परत आला, तेव्हा खरी गोष्ट कळली. तो आधी लवंगीला पाहून गार झाला. ही इथं परत आली कशी तेच त्याला कळेना. तो खरं तर तुमच्या लवंगीला आपण पळवलं हे सांगणारच नव्हता. पण तो आल्याबरोबर लवंगी त्याच्या अंगावर भुंकतच सुटली. मग करतो काय? सर्व हकीगत सांगणं भागच होतं.

ती सांगून झाल्यावर त्यानं लवंगीच्या मालकांची सपशेल माफी मागितली. म्हणाला, ''लवंगीला मी मोटारीतून पळवलं. मी असं करायला नको होतं. मला क्षमा करा. माझ्या हातून चूक झाली.'' असं म्हणून त्यानं मालकांचे पाय धरले.

आणि काय आश्चर्य? लवंगी लगेच भुंकायची थांबली. मालकांनी तिला उचलून छातीशी घेतलं. म्हणाले, ''लवंगी, तुझ्या इमानाला तोड नाही!''

***

# अंजूची मंजू

*एक होती अंजू– एक होती मंजू*
*अंजू होती मुलगी– मंजू होती मांजरी*
*अंजूचे डोळे निळे गर्द– मंजूचे डोळे हिरवे जर्द*
*अंजूला कपड्यांची भारी हौस– मंजूला आवडायचा मिकी माउस!*

–हिला तिच्याशिवाय आणि तिला हिच्याशिवाय जाम करमायचं नाही. ही शाळेत गेली की ती हाका मारीत बसणार– म्यांव म्यांव! म्यांव म्यांव! ती कुठे दिसली नाही तर ही हाका मारीत सुटणार– ए मिनी माव! ए मिनी माव!

एक दिवस काय झालं? अंजूच्या शाळेत मंजू पण गेली. गुपचुप जाऊन वर्गात बसली.

सरांनी विचारलं, "तू ग कोण?"

तर ही म्हणाली, "म्यांव म्यांव! दुसरं कोण?"

मुलांनी विचारलं, "तुझं नाव ग काय?"

ही म्हणाली, "म्यांव म्यांव! दुसरं काय?"

अंजूनं विचारलं, "माझ्या मागनं आलीस कशाला?"

मंजू म्हणाली, "खेळायला! दुसरं कशाला?"

मंजूची उत्तरं ऐकून वर्गातली मुलं झाली खूष आणि लागली तिच्याशीच खेळायला. सरांनी तर तिला उचलून घेतलं आणि लागले तिचीच गोष्ट करून सांगायला. सर्वांशी झाली गट्टी, अभ्यासाला पडली सुट्टी!

संध्याकाळी हे कळलं अंजूच्या बाबांना. तेव्हा ते रागावले. मंजूला म्हणाले, "कार्टे, अभ्यास बुडवलास सर्वांचा. देऊ का कुल्यावर फटका?"

यावर मंजूनं काय करावं? उत्तर नाही, बित्तर नाही. उठली आणि अंजूच्या बाबांच्या पोटावरच जाऊन बसली. कलिंगडावर बसल्यासारखी! बाबांच्या पोटातला राग बाहेर येणारच कसा? तसे अंजूचे बाबा आपणच लागले हसायला. म्हणाले, "काय सांगावं या कार्टीला?"

पण मग एक दिवस काय झालं? कॉलनीपलीकडच्या गल्लीत होती अंजूची एक मैत्रीण. तिचं नाव रागिणी. तिचा होता वाढदिवस. तर तिथेही अंजूबरोबर मंजू हजर!

मग काय विचारता? सर्व मुलांचं लक्ष आपलं मंजूचकडे! आपला वाढदिवस म्हणून रागिणीनं केला होता आकाशातल्या परीचा पोषाख. पण जमलेल्या मुलांचं लक्ष कुठे? अंगात एकही कपडा नसलेल्या मंजूवर! आणि सर्व मुलं आपली तिच्यातच दंग!



शेवटी रागिणीनं केक कापायला घेतला, तेव्हा कुठे सर्वांचं लक्ष तिच्याकडे गेलं. पण तेवढ्यात आपल्याकडे कुणाचं लक्ष नाही हे पाहून मंजूनं केकचा एक तुकडा उठवला, आणि बाहेरच्या अंगणात धूम ठोकली. त्याबरोबर सगळ्या मुलांनी टाळ्या वाजवल्या. तीही तिच्या मागून पळाली, आणि त्यांनी आपला तिलाच "हॅपी बर्थडे टू यू" केला!

रागिणी चिडली. पण रागिणीची आई प्रेमळ आणि थट्टेखोर होती. ती मुलांना म्हणाली, "अग, मंजूचा वाढदिवस झाला ना? आता आमच्या रागिणीचा पण वाढदिवस करा ना! चला."

ते बोलणं ऐकून जमलेल्या मुली शरमिंद्या झाल्या. सर्व जणी घरात परत आल्या. रागिणीच्या आईनं त्यांना केक, उपमा आणि वेफर असं छान छान खायला दिलं. पण खाणं संपल्यावर सर्वांचं लक्ष पुन्हा आपलं त्या अंजूच्या मंजूकडे! रागिणी भारी वैतागली. तिला आला राग. कुणाचा? तर अंजूचा. कारण काय? तर मंजू अंजूची ना? मनात म्हणाली, 'असं आहे काय? बघून घेईन.'

पण असं म्हणाली तरी रागिणीनं आपला राग मनातच ठेवला. आणि 'काय बघून घेईन?' ते आईला सुद्धा सांगितलं नाही. अंजूला तर तिनं आपल्या बेताचा थांगपत्ता सुद्धा लागू दिला नाही. उलट त्या दिवसापासून ती अंजूकडे रोज जाऊ लागली. तिनं हळूहळू अंजूच्या मंजूशी दोस्ती जमवली. मधून मधून मंजूला छातीशी कवटाळून ती आपल्या घरी आणू लागली. ती तिला दूधच नव्हे– तर पेढे-बर्फी, चकल्या, वेफर, पापड असा खूप खूप खाऊ द्यायची. पण मंजू अशी लबाड की खाऊ संपला की तिथे थांबायचीच नाही. पळत सुटायची आणि घर गाठायची!

रागिणीला मग यायचा राग. एवढे आपण लाड करतो, एवढे पदार्थ खायला देतो, तिच्याशी खेळतो, पण हिला काही आहे का त्याचं? खाणं संपलं की पसार. शेवटी रागिणीनं आईला विचारलं, "आपण मंजूचं एवढं कौतुक करतो, लाड करतो, मग ती आपल्याकडे राहत का नाही?"

आई म्हणाली, "अग, मंजूचं घर अंजूकडे आहे ना? मग ती आपल्याकडे कशी राहील? ज्याचं माणूस त्याच्याकडे जातं की नाही?"

रागिणीनं विचारलं, "पण मंजू कुठे माणूस आहे? ते आहे मांजराचं पिल्लू. खरं म्हणजे जे जास्त लाड करील, जास्त खाऊ देईल त्याच्याचकडे त्यानं राहिलं पाहिजे की नाही?"

यावर रागिणीची आई कशी म्हणते?– "ते आपलं तू त्या मंजूलाच विचार बाई. मांजरांचं मला ग काय ठाऊक? मी काय मंजूची आई आहे?"

रागिणीच्या आईचं असंच. तिला एखाद्या प्रश्नाचं उत्तर आलं नाही

की ती आपलं सगळं थट्टेवारी न्यायची. बाबांना तर विचारण्यात अर्थच नव्हता. त्यांना मुळी मांजर आवडायचं नाही. त्यांना फक्त अभ्यास आवडायचा. ते विचारणार, "करायचं काय मांजर? ते तुझा अभ्यास करणार आहे का?"

आजीला विचारलं तर तिचं आपलं वेगळंच. ती म्हणाली, "तुम्ही मांजराच्या तोंडाशी तोंड नेता. मग त्याचे केस पोटात जातात आणि डांग्या खोकला होतो. त्या फंदात तू पडूच नको."

रागिणीनं शेवटी आपला प्रश्न शेजारच्या नंदूकडे नेला. नंदू तिच्यापेक्षा एक वर्षानं मोठा होता आणि वर्गात पेपरातले सगळेच्या सगळे प्रश्न तो सोडवीत असे. तो म्हणाला, "त्याला एक सोपी युक्ती आहे. त्याला मासे खायला घाल. एकदा माशांची चटक लागली की हलणार नाही तुझ्याकडून." आणि त्यानं विचारलं, "तुझी ती मैत्रीण– अंजू– ती खाते का मासे?"

"नाही." रागिणी म्हणाली, "त्यांना मासे आवडत नाहीत."

"मग तू मासे आणच." नंदू म्हणाला. "मांजरांना मासे भारी आवडतात."

झालं. त्याच दिवशी संध्याकाळी रागिणी आईला घेऊन बाजारात गेली आणि मासे घेऊन आली. त्यातले दोन मासे तिनं प्लॅस्टिकच्या पिशवीत काढून ठेवले. त्याच पावली ती गेली अंजूकडे आणि आली मंजूला उचलून घेऊन. म्हणाली, "आज मी तुझ्यासाठी जमाडी जंमत आणलीय."

पण मंजूला पुढं काही सांगावंच लागलं नाही. तिनं बरोबर वास काढला आणि घेतली उडी माशांच्या पुडीवर. बघता बघता त्यांचा चट्टामट्टा करून टाकला. 'म्यांव' करून "आणखी आहे का?" म्हणून पण विचारलं. रागिणी म्हणाली, "आता उद्या सकाळी. आज आता खेळायचं. तू आमच्या इथे राहिलीस ना, तर आपण तुला रोज खाऊ आणू."

पण मंजूनं रागिणीच्या या बोलण्याकडे मुळीच लक्ष दिलं नाही. ती आपली उठली आणि चालायला लागली. "अग थांब थांब–" म्हणून रागिणी तिला उचलून घेण्यासाठी धावली. पण मंजू तिच्या हाताला

लागली नाही. रागिणीला खूप राग आला. पण मंजूनं मागं वळून पाहिलं पण नाही.

दुसऱ्या दिवशी मंजूसाठी तिनं आणखी मासे घेतले. ती मंजूला घेऊन आली आणि म्हणाली, "खा किती ते!" मंजूनं त्यांच्यावर ताव मारला. गंमत अशी की ते संपवल्यावर मंजूला आली सुस्ती. ती तिथेच आडवी पसरली आणि आरामात झोपून गेली.

मंजूला झोप लागली तशी रागिणी खूष झाली. म्हणाली, "लबाडे, आता कुठे जाशील? आता तुला इथंच राहावं लागेल. कशी राहत नाहीस तेच बघते."

रागिणीच्या घरात त्या वेळी कुणीच नव्हतं. आई शाळेत, बाबा ऑफिसात. भाऊ कॉलेजात. आजी गेली होती काकांकडे. ती दुपारपर्यंत येणारच नव्हती. रागिणीला शाळेत जायचं होतं. शेजारचा नंदू म्हणाला, "राहू दे ना ती झोपून! तू बाहेरून कुलूप लाव आणि शाळेत जा. दुपारी शाळेतून आलीस की आणखी मासे खायला दे. एकदा तिला माशांची चटक लागली की कशाला जातेय ती त्या अंजूकडे?"

रागिणीनं मग शाळेचे कपडे चढवले. दप्तर भरून घेतलं आणि बाहेरच्या दाराला कुलूप लावून ती शाळेत गेली. मंजू पळून जायला नको म्हणून तिनं घराच्या सर्व खिडक्याही बंद करून टाकल्या. घराची चावी नंदूकडे ठेवून ती मोठ्या खुषीनं शाळेत निघून गेली.

इकडे घरात झोपलेली मंजू थोड्या वेळानं जागी झाली. पाहते तर सगळीकडे काळोख. दारं-खिडक्या बंद. तिनं सगळ्या खोल्या फिरून पाहिल्या. पण सगळीकडे सगळं बंद. घराबाहेर पडायला एकही वाट नाही. तिनं 'म्यांव म्यांव' करून खूप ओरड केली. ओरडून ओरडून तिचा घसा कोरडा झाला. तहानेनं पण घशाला कोरड पडली. पण पाण्याची भांडीसुद्धा बंद. आता मात्र मंजू चिडली. संतापानं तिच्या डोळ्यांचे निखारे बनले. घरभर उड्या मारून तिनं थयथयाट केला. पण कुणीच तिला सोडवायला येत नव्हतं.

मधल्या सुट्टीत रागिणी शाळेतून घरी आली, तरी आजी घरी आलेली

की ती आपलं सगळं थट्टेवारी न्यायची. बाबांना तर विचारण्यात अर्थच नव्हता. त्यांना मुळी मांजर आवडायचं नाही. त्यांना फक्त 'अभ्यास आवडायचा. ते विचारणार, "करायचं काय मांजर? ते तुझा अभ्यास करणार आहे का?"

आजीला विचारलं तर तिचं आपलं वेगळंच. ती म्हणाली, "तुम्ही मांजराच्या तोंडाशी तोंड नेता. मग त्याचे केस पोटात जातात आणि डांग्या खोकला होतो. त्या फंदात तू पडूच नको."

रागिणीनं शेवटी आपला प्रश्न शेजारच्या नंदूकडे नेला. नंदू तिच्यापेक्षा एक वर्षानं मोठा होता आणि वर्गात पेपरातले सगळेच्या सगळे प्रश्न तो सोडवीत असे. तो म्हणाला, "त्याला एक सोपी युक्ती आहे. त्याला मासे खायला घाल. एकदा माशांची चटक लागली की हलणार नाही तुझ्याकडून." आणि त्यानं विचारलं, "तुझी ती मैत्रीण– अंजू– ती खाते का मासे?"

"नाही." रागिणी म्हणाली, "त्यांना मासे आवडत नाहीत."

"मग तू मासे आणच." नंदू म्हणाला. "मांजरांना मासे भारी आवडतात."

झालं. त्याच दिवशी संध्याकाळी रागिणी आईला घेऊन बाजारात गेली आणि मासे घेऊन आली. त्यातले दोन मासे तिनं प्लॅस्टिकच्या पिशवीत काढून ठेवले. त्याच पावली ती गेली अंजूकडे आणि आली मंजूला उचलून घेऊन. म्हणाली, "आज मी तुझ्यासाठी जमाडी जंमत आणलीय."

पण मंजूला पुढं काही सांगावंच लागलं नाही. तिनं बरोबर वास काढला आणि घेतली उडी माशांच्या पुडीवर. बघता बघता त्यांचा चट्टामट्टा करून टाकला. 'म्यांव' करून "आणखी आहे का?" म्हणून पण विचारलं. रागिणी म्हणाली, "आता उद्या सकाळी. आज आता खेळायचं. तू आमच्या इथे राहिलीस ना, तर आपण तुला रोज खाऊ आणू."

पण मंजूनं रागिणीच्या या बोलण्याकडे मुळीच लक्ष दिलं नाही. ती आपली उठली आणि चालायला लागली. "अग थांब थांब–" म्हणून रागिणी तिला उचलून घेण्यासाठी धावली. पण मंजू तिच्या हाताला

लागली नाही. रागिणीला खूप राग आला. पण मंजूनं मागं वळून पाहिलं पण नाही.

दुसऱ्या दिवशी मंजूसाठी तिनं आणखी मासे घेतले. ती मंजूला घेऊन आली आणि म्हणाली, "खा किती ते!" मंजूनं त्यांच्यावर ताव मारला. गंमत अशी की ते संपवल्यावर मंजूला आली सुस्ती. ती तिथेच आडवी पसरली आणि आरामात झोपून गेली.


मंजूला झोप लागली तशी रागिणी खूष झाली. म्हणाली, "लबाडे, आता कुठे जाशील? आता तुला इथंच राहावं लागेल. कशी राहत नाहीस तेच बघते."

रागिणीच्या घरात त्या वेळी कुणीच नव्हतं. आई शाळेत, बाबा ऑफिसात. भाऊ कॉलेजात. आजी गेली होती काकांकडे. ती दुपारपर्यंत येणारच नव्हती. रागिणीला शाळेत जायचं होतं. शेजारचा नंदू म्हणाला, "राहू दे ना ती झोपून! तू बाहेरून कुलूप लाव आणि शाळेत जा. दुपारी शाळेतून आलीस की आणखी मासे खायला दे. एकदा तिला माशांची चटक लागली की कशाला जातेय ती त्या अंजूकडे?"

रागिणीनं मग शाळेचे कपडे चढवले. दप्तर भरून घेतलं आणि बाहेरच्या दाराला कुलूप लावून ती शाळेत गेली. मंजू पळून जायला नको म्हणून तिनं घराच्या सर्व खिडक्याही बंद करून टाकल्या. घराची चावी नंदूकडे ठेवून ती मोठ्या खुषीनं शाळेत निघून गेली.

इकडे घरात झोपलेली मंजू थोड्या वेळानं जागी झाली. पाहते तर सगळीकडे काळोख. दारं-खिडक्या बंद. तिनं सगळ्या खोल्या फिरून पाहिल्या. पण सगळीकडे सगळं बंद. घराबाहेर पडायला एकही वाट नाही. तिनं 'म्यांव म्यांव' करून खूप ओरड केली. ओरडून ओरडून तिचा घसा कोरडा झाला. तहानेनं पण घशाला कोरड पडली. पण पाण्याची भांडीसुद्धा बंद. आता मात्र मंजू चिडली. संतापानं तिच्या डोळ्यांचे निखारे बनले. घरभर उड्या मारून तिनं थयथयाट केला. पण कुणीच तिला सोडवायला येत नव्हतं.

मधल्या सुट्टीत रागिणी शाळेतून घरी आली, तरी आजी घरी आलेली




नव्हती. घर बंदच होतं. म्हणजे मंजू घरातच होती. तिला इतका आनंद झाला, इतका आनंद झाला की उड्या मारीत ती शेजारी गेली आणि चावी घेऊन आली. मोठ्या खुषीनं तिनं दार उघडलं तर काय?–

घरात कोंडून ठेवलेल्या मंजूनं चिडून रागिणीच्या अंगावर उडी घेतली, तिला ओरबाडून काढलं. रागिणी घाबरून किंचाळली, आणि धडपडून खाली पडली. शेजारपाजारची माणसं तिच्या मदतीला धावून आली, पण तोपर्यंत मंजू तिथून पसार झाली.

तेवढ्यात रागिणीची आजी आली. तिनं डॉक्टरांना बोलावून घेतलं. त्यांनी उपचार केले, रागिणीची भीती घालवली. डॉक्टर गेल्यावर रागिणीनं आजीला विचारलं, "मी मंजूवर इतकं प्रेम केलं, एवढं त्याचं कौतुक केलं आणि मलाच कशी चावली ती?"

आजी म्हणाली, "पण तू तिला कोंडून ठेवलंस ना? कोंडून ठेवलं की मांजर पिसाळतं आणि जे दार उघडील त्याला डसतं. आणि तुला माहीत आहे?–"

"काय?" रागिणीनं विचारलं.

"मांजराला दूर नेऊन सोडलं तरी ते आपलं मूळ घर शोधत येतं. त्याच्या मनात नसलं तर ते दुसरीकडे कुठेही राहत नाही. काही मांजरं तर

एवढी घरवेडी असतात!– मागं रशियातलं एक मांजर बर्फानं भरलेल्या कित्येक मैल लांबीच्या वाटा पार करून आपल्या मालकिणीकडे परत आलं. अग, प्रत्येकाला आपलं घर प्रिय असतं. तू राहशील का आपलं घर सोडून दुसरीकडे? तुला कुणी खाऊच्या टेकड्या नि कपड्यांचे डोंगर दिले म्हणून?''

यावर रागिणी काय बोलणार? त्या दिवसापासून तिनं मंजूचा नाद सोडून दिला.

***

# दोस्तीच्या मस्त वाटेनं!

तुम्ही कधी घोड्यावर बसलाय का? नाही? बरं, घोडा पाहिला तरी आहे का? आहे ना? कसा मस्त रुबाबदार दिसतो! जितका रुबाबदार तितकाच इमानदार. पुन्हा कुत्र्यासारखा भुंकत बसणार नाही. आपणाला काय करायचं ते एक शब्द न बोलता गुपचुप करून मोकळा. न बोलून शहाणा. धन्यावरील प्रेमात तर कुत्र्यालाही हार जाणार नाही!

आणि पळण्यात तर त्याचा पाय धरणारा एकही प्राणी अख्ख्या जगात सापडणार नाही. डोंगराळ, खडकाळ वाटेनं सुद्धा दमदारपणे चालावं ते घोड्यानंच. टबडक टबडक करीत हा अरण्यातून निघाला तर वाघ-सिंहांची सुद्धा हिंमत होत नाही वाटेत येण्याची. म्हणूनच पूर्वीचे लोक घोड्यावरून प्रवासच नव्हे, तर लढाया सुद्धा करीत. शिवाजी महाराज, राणा प्रताप, झाशीची राणी यांचे पराक्रम ऐकलेयत ना? ते त्यांना घोड्याची साथ मिळाली म्हणूनच करता आले.


तर असा हा माणसाचा इमानदार आणि जिवलग साथीदार. आपल्याकडे आता तो फारसा दिसत नाही. सायकली, स्कूटरी आणि मोटारी आल्या ना? तेव्हापासून माणसाला घोड्याची गरज उरली नाही. पण या जगात अजूनही असे काही प्रदेश आहेत की तिथे मोटारीबिटारीचं काम नाही. तिथे घोडाच पाहिजे. मध्य प्रदेश, हिमालय पर्वत अशा डोंगराळ प्रदेशांत अजूनही घोड्यावर बसून प्रवास करणारे बहाद्दर आहेत.

असाच एक बहाद्दर हिमालयाच्या पायथ्याशी राहायचा. त्याचं नाव तेजबहाद्दर. हा बहाद्दर केवढा माहीत आहे का? बारा वर्षांचा. पण हाडापेरानं असा मजबूत की तरणाबांड पुरुष वाटायचा. घोड्यावर बसण्यात

एकदम पटाईत. तीन वर्षांचा असतानाच तो वडलांच्या घोड्यावर चढून बसू लागला. त्याच्या वडलांचा घोडाही असा शहाणा! एवढासा तेजबहाद्दर आपल्या पाठीवर बसला की तो त्याला कुठून कुठून फिरवून आणायचा. न पाडता, न दुखवता. असं करता करता तेजबहाद्दर घोडेबहाद्दर बनला! घोड्यावरून फिरण्यात, लांबलांबच्या सफरी करण्यात तरबेज झाला. आजुबाजूची कित्येक डोंगरी गावं त्याला पाठ झाली.

म्हणूनच त्याच्या वडलांनी त्याच्या एका वाढदिवसाला त्याला एक मस्त घोडा आणून दिला. त्याचं नाव देवयान. देवयान म्हणजे कळलं ना? देवाचं यान– म्हणजेच देवाचं विमान! देवयानावर तेजबहाद्दरचं विलक्षण प्रेम होतं. तितकंच विलक्षण प्रेम देवयानचंही या आपल्या छोट्या मालकावर होतं. दोघांनाही एकमेकाशिवाय एक वेळही राहवत नसे. त्यामुळे तेजबहाद्दरला चाबूकही लागत नसे. तो घोड्याशी चक्क बोलायचा. चालता चालता अगदी हळू आवाजात एवढंच म्हणायचा, "ए भाय, जरा आस्ते चलो!" की देवयान पळणं सोडून चालत निघायचा.

"देवयान, आज जलदी जायचंय आणि ज़ल्दी परत यायचंय हां?" एवढं म्हटलं की बास. देवयान त्यातला 'जलदी' शब्द बरोबर ओळखायचा



आणि पळत सुटायचा. जणु तो त्या 'जलदी' शब्दालाच पकडण्यासाठी धावतोय असं वाटायचं!

तो असा बाणासारखा सुटलेला असताना मध्येच तेजबहाद्दरनं एवढंच म्हणायचं, "थांब!" की देवयान जिथल्या तिथे उभा. खांब बनल्यासारखा! वाटेत तेजबहाद्दरनं जर बारीक शीळ घातली तर देवयान निघाला नदीच्या शोधात. कशाला कळलं का? आपल्या धन्याला तहान लागली आहे म्हणून!

अशी ही तेजबहाद्दरची भाषा देवयानला पाठ झाली होती. जास्त बोलण्याची, ओरडण्याची, चाबूक फटकावण्याची गरजच उरली नव्हती. तेजबहाद्दरचं म्हणणं काय माहीत आहे का? देवयान आपला जानी दोस्त आहे. जिवलग मित्र आहे. त्याला चाबूक लावायचा का?

पण असा हा जानी दोस्त एक दिवस अचानक कुठे गायबच झाला. काय झालं? एक दिवस देवयानच्या पाठीवर बसून तेजबहाद्दर आपल्या मामाच्या गावी गेला होता. तिकडून परत येत असताना वाटेत त्याला तहान लागली. म्हणून त्यानं देवयानला शीळ घालून नदीकडे चलण्याची खूण केली. पण जवळपास नदी नव्हती. म्हणून देवयाननं एक विहीर शोधून काढली. तिच्या नजीक येऊन तो उभा राहिला.

विहीर खूप खोल होती. तिचं पाणी वर काढायला कसलंही साधन नव्हतं. त्यामुळं तेजबहाद्दरला पाणी पिण्यासाठी खूप खोल उतरून जावं लागलं. ओंजळीत पाणी घेऊन तो पोटभर प्यायला. पण त्याच वेळी वरून देवयान खिंकाळला. तो खिंकाळतोय म्हणजे त्यालाही तहान लागली की काय, असं तेजबहाद्दरला वाटलं. म्हणून त्यानं काय केलं? डोक्याचा पटका काढला. तो पाण्यात चांगला भिजवला, आणि त्याचा ओला थपथपीत पिळा घेऊन तो वर आला. त्या पिळ्यातलं थपथपणारं पाणी पिळून तो ते देवयानच्या तोंडात ओतणार होता. त्यातून खूप नाही, तरी थोडं तरी पाणी त्याला मिळेल. त्यानं त्याची तहान तात्पुरती तरी भागेल, असं म्हणून तो विहिरीबाहेर आला.

पण तिथे पाहतो तर काय? देवयान आहे कुठे? तो कुठेच दिसत

नव्हता. त्यानं आजूबाजूला, वर-खाली, झाडाझुडपात सर्वत्र फिरून पाहिलं. समोरच्या टेकाडावर पाहिलं. पण देवयान कुठेच दिसला नाही. पटक्याच्या पिळ्यातलं पाणी सांडून गेलं, पिळा कोरडा होत चालला, तरीही देवयानचा पत्ता नाही. आता मात्र तेजबहाद्दर काळजीत पडला. असं कधीच झालं नव्हतं. विहीर असो, नदी-नाला असो, तेजबहाद्दर खाली उतरून कुठेही गेला तरी देवयान तिथेच थांबे. आजूबाजूला हिरवं गवत किंवा आवडता झाडपाला दिसला तर चरत राही. तहान लागली असेल आणि समोर नदीनाला असेल तर आपणही पोटभर पाणी पिऊन घेई.

खरं तर तेजबहाद्दर खाली उतरला तेव्हा देवयान तिथलं हिरवं गवतच शोधायला निघाला होता. पण मग एकाएकी त्याच्या खिंकाळण्याचा आवाज आला आणि त्यालाही तहान लागली असेल म्हणून त्यानं पटक्याच्या ओल्या पिळ्यातून ते पाणी आणलं होतं. असं असताना हा गेला तरी कुठे?

हे काय गौडबंगाल झालं? देवयान एकाएकी असा लुप्त कुठे झा़ला? एवढा पांढराशुभ्र, उंचनिंच घोडा. कुठूनही नजरेत भरणारा. तो नजरेआड झालाच कसा? मालकाला सोडून हा गेलाच कसा?

शेवटी त्याला शंका आली. आपल्या देवयानला कुणी पळवून तर नेलं नाही? आणि म्हणूनच तो खिंकाळला होता का? 'मालक, मला कुणी तरी पळवतोय, जबरीनं घेऊन चाललाय हो– धावा लवकर!' असं सांगण्यासाठी तो खिंकाळला असेल का?

ती शंका येताच 'देवयान, देवयान' म्हणून तो सगळीकडे हाका मारीत सुटला. तेजबहाद्दर जिथे थांबला होता ते ठिकाण म्हणजे चार डोंगरांच्या मध्ये असलेली दरी होती. ही दरी एखाद्या मोठ्या वाटीसारखी होती. तिथून चारी डोंगरांवर साप वळवळत गेल्यासारख्या चार वाटा फुटल्या होत्या. यातल्या कुठल्या वाटेनं आपला देवयान गेला असेल? तेवढं कळलं असतं तरी तो त्या वाटेनं धावत सुटला असता.

मधूनमधून तो 'देवयान-देवयान' करून हाका मारीतच होता. पण त्या

हाका आसमंतात घुमत आणि ओ देणारा कुणी नाही म्हणून परत येत. त्यामुळे तो अधिकच निराश होई.

पण त्याच्या हाका फुकट गेल्या नाहीत. त्यांना ओ देणारा कुणी तरी भेटला. समोरच्या डोंगरमाथ्यावर खूप गुरं चरत होती. त्यांचा एक गुराखी आपल्या घोड्यावर बसून खाली आला. घोडा तेजबहाद्दरपाशी उभा करून त्यानं त्याला विचारलं, "तो घोडा तुझा होता का?"

"हो!" तेजबहाद्दरला तो गुराखी अगदी देवदूतासारखा वाटला. त्यानं विचारलं, "तू कुठे पाहिलास?"

"घोडा कसल्या रंगाचा होता?"

"पांढरा शुभ्र!"

"मग बरोबर."

"काय बरोबर?" तेजबहाद्दरनं विचारलं.



"एका माणसानं तुझा घोडा उठवला. तू विहिरीत उतरला होतास ना? तेव्हा. या मागच्या झाडीतून तो माणूस आला. चांगला तगडा होता. तो जबरीनं त्या घोड्यावर बसला आणि त्याला घेऊन गेला."

"कुठे घेऊन गेला? कुठल्या रस्त्यानं गेला?"

"त्या रस्त्यानं." असं म्हणून त्यानं एक वाट दाखवली. ती उत्तरेकडे जाणारी डोंगरवाट होती.

"पण देवयान गेला कसा त्याच्याबरोबर?" तेजबहाद्दरनं विचारलं. त्याला ते खरंच वाटत नव्हतं. त्याला फार वाईट वाटलं. कसलं माहीत आहे का? आपल्या

देवयाननं त्या परकी माणसाला पाठीवर बसूच दिलं कसं? म्हणूनच त्या गुराखी मुलाला त्यानं विचारलं, "तुला माहीत आहे? माझा घोडा परकी माणसाला अंगाला हातसुद्धा लावू देत नाही. मग तो गेलाच कसा त्याच्याबरोबर?"

गुराखी हसून म्हणाला, "ते मी कसं सांगू? ते तू आपल्या देवयानलाच विचार, तो भेटल्यावर!"

त्याचं हे थट्टेचं बोलणं तेजबहाद्दरला आवडलं नाही. या वेळी त्याला थट्टा नको होती. तो म्हणाला, "पण माझ्या बोलण्याचा मतलब तुला कळला का?"

"कळला." गुराखी म्हणाला, "पण तुझा घोडा खुषीनं नाही गेला त्याच्याबरोबर. तो त्याला जाम दाद देत नव्हता. पण त्यानं त्याला काठीनं खूप मारलं. मग काय करील तो बिचारा?"

हे ऐकून तेजबहाद्दरला चीड आली. फार वाईटही वाटलं. तो म्हणाला, "माझा देवयान! एक वर्षाचा बच्चा असल्यापासून तो आमच्याकडे आहे. बाबांनी तो मला घेऊन दिला तेव्हा मी पाच वर्षांचा होतो. पण तेव्हापासून आजपर्यंत मी एकदाही चाबूक घेतलेला नाही. तो फक्त माझ्या शब्दावर चालणारा घोडा आहे."

"मग बरोबर आहे." गुराखी म्हणाला. "त्याला चाबकाची सवयच नाही ना? म्हणूनच त्या परकी माणसाच्या झोडपण्यामुळं तो घाबरला असेल. मुकं जनावर. काय करणार बिचारा? चल, आपण त्याला शोधून काढू. हे बघ, माझा घोडा वाऱ्यासारखा पळतो. आपण त्याला गाठून काढू. आणि एक लक्षात ठेव."

"काय?"

"घोडा तुझ्या एवढा प्रेमाचा असेल ना, तर त्या माणसाबरोबर तो जोरात पळणारच नाही. नाइलाजानं, मनाविरुद्ध जाणार ना तो? तो कशाला धावणार? रडतखडतच जाणार तो. आपण नक्कीच त्याला गाठून काढू. चल, बस माझ्या मागं."

"पण तुझी गुरं आहेत ना डोंगरावर?"

"आपले गुराखी मित्र आहेत ना तिकडे? ते पाहतील. तू ती काळजी सोड. चल, बस लवकर."

"तू जर माझा घोडा शोधून काढलास ना, तर माझे बाबा तुला चांगलं बक्षीस देतील."

"बक्षीस?" गुराखी म्हणाला, "अरे, बक्षीस आपण त्या घोडेचोराकडूनच वसूल करू! चल तू."

ते ऐकून तेजबहाद्दरलाही जोर चढला. तो झटकन चढून गुराख्याच्या मागं बसला. गुराख्याचा घोडा काळ्या रंगाचा होता. त्याच्या कपाळावरून नाकापर्यंत पांढरा पट्टा पसरला होता. प्रकाश पडल्यासारखा. खरं तर तो घोडा नव्हताच. ते होतं लहानखुरं तट्टू. पण पळण्यात भारी होतं. हां हां म्हणता ते उत्तरेकडची टेकडी चढून वर आलं. पुढं उतार होता. उतार पार केल्यावर लांबवर अगदी सपाट जमीन होती. खूप मोठं पठारच होतं ते.

ते पठार पार करून गुराख्याच्या तट्टानं पुढचा दुसरा डोंगर पकडला. हाही डोंगर चढून ते पुन्हा उताराला लागले, आणि अकस्मात दोघांच्याही नजरा चमकल्या. लांबवर एक नदी दिसत होती. तिच्या अलिकडे एक पांढरा कपडा वाळत घातलेला दिसू लागला. पण थोड्याच वेळात तो कपडा पुढं पुढं सरकतो आहे असं वाटू लागलं. आणखी थोडा उतार पार केल्यावर तेजबहाद्दरची खात्रीच झाली. तो एकदम ओरडलाच, "अरे यार, आपला देवयान आंहे तो. नदीकडे चाललाय. पाणी प्यायला असणार."

आता गुराख्याचीही खात्री झाली. तो घोडाच आहे. त्यानं विचारलं, "पण तो घोडेचोर कुठाय? त्या चोरानं याला सोडून कसं दिलं?"

"ते घोडेचोराला ठाऊक. ते इथून कसं कळणार? आपणाला आपला घोडा मिळाल्याशी कारण." तेजबहाद्दर अधीर होऊन म्हणाला.

गुराखी आपल्या तट्टाला म्हणाला, "टबडक, जलदी कर जलदी."

त्यानं आपल्या तट्टाचं नाव टबडक ठेवलं होतं. मालकाच्या आज्ञेवरून तो चौखूर धावत सुटला. पण थोड्याच वेळात टबडक अचानक थांबला. बाजूच्या खडकात एक माणूस पडला होता. त्याला पाहून तो थबकला

होता. ते पाहून गुराखी अचानक ओरडला, "अरे यार, हे बघ काय ते?"

"काय?" तेजबहाद्दरनं विचारलं.

"रस्त्याच्या कडेला बघ ना? त्या दगडांच्या खाचीत!"

तेव्हा कुठे तेजबहाद्दरचं तिकडे लक्ष गेलं. पाहतो तर काय? एक मनुष्य रस्त्याबाहेरच्या दगडात पडलेला. पडला कसला? कोसळलाच होता. तो जिवंत आहे की मेला आहे ते पण कळत नव्हतं. जवळ जाऊन त्यांनी पाहिलं, तर तोंड उघडं होतं, पण त्याच्या छातीचा भाता चालू होता. तो मेला नव्हता. तो बेशुद्ध होऊन पडला होता. त्याचं अंग दगडांत चांगलंच ठेचकाळलं होतं. ढोपरातून रक्त वाहत होतं. कपाळावरही रक्ताळलेली जखम दिसत होती. आणि त्याचं शरीर दोन दगडींच्या खाचीत सापडलं होतं.



गुराख्यानं तेजबहाद्दरला विचारलं, "कळलं काय झालं ते?"

"काय?"

"तुझ्या देवयाननं त्याला इथे फेकून दिलंय."

"कशावरून?"

"तुला माहीत नाही. हे घोडे फार शहाणे असतात. त्यांच्यावर जुलूम करून बसलं ना तर ते बघतात बघतात आणि फेकून देतात तुम्हांला. अरे, कुठलाही इमानदार घोडा हेच करणार ना? नक्कीच. तुझ्या देवयाननं तेच केलंय यार."

"काय?"

"या घोडेचोराला फेकून दिलंय. जागा पण काय मस्त काढलीय शोधून? कोसळलेला माणूस वर उठणारच नाही!"

पण त्यांचं हे बोलणं चालू असताना तिथे आजूबाजूची खूप माणसं जमा झाली. ते म्हणत होते, "दगडात कोसळलेला माणूस आपला गाववाला आहे." ते तर या दोघांना म्हणायला लागले, "तुम्हीच त्याला मारून टाकलंय."

त्यांनी या दोघांना गराडाच घातला. हे पाहून तेजबहाद्दर तर गांगरूनच गेला. पण गुराखी मुलगा डगमगला नाही. तो म्हणाला, "तुमचा मनुष्य केवढा तगडा आणि धिप्पाड आहे? आम्ही केवढी पोरं? आम्ही तसं काही करायला गेलो असतो तर काय झालं असतं माहीत आहे का? आम्हांलाच त्यानं फेकून दिलं असतं या खाचीत." तिकडे देवयान पाणी पिऊन नदीबाहेर पडला होता. त्याच्याकडे बोट दाखवून गुराखी मुलगा म्हणाला, "तो पाहिलात घोडा? हे सर्व त्यानं केलंय."

त्या लोकांच्या म्होरक्यानं विचारलं, "आता तुम्ही आपला गुन्हा घोड्याच्या नावावर ढकलताय काय? घोडा काय येडा हाय का? का तो पिसाळलाय?"

"घोडा नक्कीच पिसाळलेला असणार." तेजबहाद्दरलाही आता जोर चढला होता. "त्याला जबरीनं पळवून नेत होता तो. घोडा चलायला तयार नाही, तर काठीनं झोडपून काढलं त्याला. मी विहिरीत उतरून पाणी पीत असताना."

"कशावरून?" म्होरक्यानं विचारलं.

गुराखी मुलगा म्हणाला, "मी पाहिलं ना? डोंगरावरून" आणि त्यानं झालेली सर्व हकीकत त्या लोकांना समजावून सांगितली.

पण तरीही त्यांच्या म्होरक्यानं विचारलं, "पण हा घोडा तुझा तरी कशावरून?"

पण याचं उत्तर देण्याची गरजच उरली नाही. तिकडून देवयान धावत सुटला होता. त्यानं आपल्या मालकाला पाहिलं होतं. एवढ्या लांबूनही

बरोबर ओळखून काढलं होतं. आणि म्हणूनच तो दौडत निघाला होता. ते पाहून तेजबहाद्दर म्हणाला, "तो पाहा. आता तो स्वतःच येतोय इकडे. त्यालाच विचारा आणि आपली खात्री करून घ्या!"

एवढं म्हणेपर्यंत देवयान तिथं येऊन धडकलाच. इकडेतिकडे न बघता तो सरळ पुढं आला आणि तेजबहाद्दरशी जाऊन उभा राहिला. त्याचं नाक फुरफुरत होतं आणि डोळे म्हणत होते, 'मालक, आता बघताय काय? बसा पाठीवर आणि लवकर चला घरी.'

देवयाननं मालकाशी केलेली ही बिनशब्दांची बातचीत मात्र त्या डोंगरी लोकांना बरोबर कळली. कारण तेही घोडेवालेच होते ना? घोड्यांची भाषा, त्यांचं प्रेम त्यांना चांगलं ठाऊक होतं.

त्यांची अशी खात्री करून दिल्यावर तेजबहाद्दर देवयानवर पुन्हा स्वार झाला. गुराखी मित्राला म्हणाला, "आज मला माझा देवयान तुझ्यामुळं परत मिळाला. चल, तुला आपण मोठ्ठं बक्षीस देणार."

गुराखी मुलगा हसला. म्हणाला, "बक्षीस? बक्षीस एकच पाहिजे."

"कसलं?" तेजबहाद्दरनं विचारलं.

"बक्षीस दोस्तीचं. आजपासून आपण दोघे जिगरी दोस्त बनलो."

"जरूर." असं म्हणून तेजबहाद्दरनं लगेच दोस्तीचा हात पुढं केला. मग दोघेही आपापल्या घोड्यावर बसून निघाले– त्याच दोस्तीच्या मस्त वाटेनं.

IRBK-0130605

अ. पं. सं.
99121२002
ना. क्र. 30605
विषय